# एक दिशाहीन पंचमहाभूत

दत्ता पांढरे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2553



REFBK-0025322
REFBK-0025322

संदर्भ काव्य
२५५३
२५३२२
१५१८६

रा. क्र. 2443
काव्य १५१८६
२५३२२



जगण्याने कुणा काय दिले
याचा ताळेबंद कुणी करू नका ।
मरण्याने कुणाच्या काय राहून गेले
याचा शोध कुणी घेऊ नका ।।



नाताळ - ८६

सर्व हक्क दत्ता पांढरे यांचे स्वाधिन
विम्को | जूनी चाळ, डी ९/३, अंबरनाथ ४२१ ५०५ जि. ठाणे.

प्रकाशन :- डीपीज् पब्लिकेशन

प्रकाशक :- गजानन गोसावी
महादू गोसावी चाळ, रूम नं. १, नविन भेंडीपाडा
अंबरनाथ - ४२१ ५०५

मांडणी :- दत्ता पांढरे
अरूण कालवणकर

मुखपृष्ठ / आतील चित्रे / मलपृष्ठ :- अरूण कालवणकर.

मुद्रक :- विश्राम शिरवाडकर
रंगनाथ मुद्रण, सी-३५, श्रीराम इंडस्ट्रियल इस्टेट, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
दूरध्वनी : ४१२ १९६७

ऋणनिर्देश - श्री. सुहास सावरकर श्री. वसंत गोसावी

बारी :- पहिली : ११०० :

किंमत :- तीस रुपये. ३०/- रु. फक्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 2543
संग्रह शाखा

मला पिदवून पिदवून
सर्व प्रश्नार्थक उद्‌गारांचं शिष्यत्व
स्वखुशीनं पत्करायला लावणाऱ्या
माझ्या प्रेयसीस
प्रिय बेकारीस
व
सुहृद मित्र
गॅन्स्टीनन गोसाव्हस्कीस

स्वल्प अर्ध पूर्ण विराम
प्रश्न उद्गार अवतरणचिन्हं
ह्या सर्वातून मुक्त केलेला हा
मुक्त छंद

# एक दिशाहीन पंचमहाभूत

दत्ता पांढरे

REFBK-0025322
REFBK-0025322

# तुमच्या जखमेसाठी

तुमच्या जखमेसाठी

तुमच्या जखमेसाठी
होय
तुमच्या जखमेसाठीच
चेचून ठेचून घेतलंय हळकुंड पिढीनं
पीठ होऊन धरलाय लेप
तुमच्या जखमेवर
तुमच्या दिमतीखातर झाले तमाशा नंगानाच
तुमच्या गमतीखातर झाले चुटके विदूषक
तुमच्या घाणीसाठी झाले झाडू घाण लोट
मेलेल्या नाकानं
मणक्याची माळ दरमहा व्याजात कापून
युगेनि युगे रोखली नजर अंगठ्यावर
आत्म्याच्या लाचारीसह

पण लक्षात ठेवा

मी लेप होण्याचं नाकारतोय
मी मणक्याच्या माळेत भरीन दारू ठसाठस
पेटवून तिला
पाहीन तुमचा सैरावैरा नंगानाच
माझ्या पिवळ्या धुरांन पडीन
सूर्याच्या पोटात कावीळ होऊन
हुंगीन माझंच झालेलं सूर्यफूल एकेदिशी
जिवंत नाकानं

लक्षात ठेवा
पिढी बदलली आहे
जाणिवेसकट परंपरा ठोकरून

# अस्थिर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
वा. क्र. 2443
24322
शाखा (स्थळ प्रत)

चिंताक्रांत
आकांत
मुसळधार बेफाम नि भर वसंत बहरात
ही कुष्ठझडी पडझड

पडझड
नि
अक्कल दाढ
यांचा गहिरा संबंध जाणवू लागलाय मला

नि एकेका वृतीवर बिब्बे उमटवत तप्त
कढवलेले
डागाळलेल्या कणाकणासह
उगाळत गुजर गुंजन गुजरात
ढकलचंदन होत होत काही बाबतीत
काही बाबतीचा
ध्यास पुसतपोसत
करायला लावतोय आत्महत्या
बाबऱ्या ओठांसाठी
फिदा होणाऱ्याना झुलवत भुलवत

कदाचित स्वत:लाच

या अशा मस्तमलंगमौलाना धुंदीत
चढत राहीलो शिडी
झोंबली चितनिपचित मढी

नि
पाहिला त्यांच्या डोळ्यात मेलेला करूणबुद्ध

गलबताच्या डोळ्यात
पेटलेली चूल
कुडकुडणारे वल्हे
अमाप पाणी - अमाप पाण्यातच अथांग प्यास
हा ताळेबंद अचूक चुकत
आलेला चुकचुकत
नि
शब्दांच्या जंगलात हरवताना आपणहून
खडे खडे खडे चारले चांगल्या चांगल्या
प्रस्थापित वाटाड्याना

ह्या अस्थिरतेला
स्थिरावलेपण देणाऱ्या
हे माझ्या उद्धारकर्ती
ही उधारी
आयुष्यभर उधारच राहू दे
कशाकशानेही न फिटणारी

माझ्या उद्धारकर्ती
काही फिटलं / फेडलं की
त्याचा शेवट होतो
म्हणून
अगं म्हणून
मान्य

# मुठीत आकाश नाही

मुठीत आकाश नाही
आत्म्यातली जमीन पहात / ऐकत राहते आ वासून
अविरत धडपडणाऱ्या पायांची प्रकरणे
दिवस-रात्रीच्या
गैर अगैर चवी चाखत
तृषीतच राहते प्रत्येक इंद्रिय

या बेकारीचे एम्प्लॉयमेंटला खेटे
या खेट्यात शाश्वत / अशाश्वत प्रश्नमालिका
या प्रश्नमालिकेत ढळत चाललेलं लगीनवय
या लगीनवयानं केलेलं हस्तमैथुन
या हस्तमैथुनांनी पाहिलीयत खिशाची भोकं
या भोकाला कधी चलनी ठिगळ
या ठिगळावर उपदंशाचा न पेलवणारा थयथयाट

या थयथयटावर चढवलेलं निरोधी चिलखत
या निरोधी चिलखताचा वापर प्रत्येक बाबतीत

अधाशी डोळे
चाखीत जिभल्या
पाहत बाटलीतला समुद्र

मनमुराद आर्थिक उधळणीची ८४ आसनं जमलीच नाहीत

वळवळताहेत उरात दाटून असंख्य जळफळी
त्याही मिळमिळीत
अनेक दहशती दाखवून मीच मला
करतोय बंढ व्हाया
ज्यातच सारं
कर्तृत्व / करिअर
आरपार बघण्याची ताकद / जिद्द, वीर्यगांभीर्य
अक्कल दाढ दाढीझ्याटे
जेते जाती आपल्या वाटे
लखवा मारून अपंग झालेल्या मेंदूच्या ठिकऱ्या
विकृत शिखरमाळावर खुलेआम

खुलेआम पहात राहतात माझ्या तेजस्वी गोळ्या
द:ुख माथ्यावर लिहून न घेतलेल्या गोळ्यांचा गर्भपात
हसतात गोळ्या तेजाबी लोळ होऊन सुटला
तर मग सरकारमान्य द:ुखात पिचणाऱ्यांना
द्या ना सरकारमान्य खलिता आत्महत्येचा
असे आमचे हे मरण जगवून

जगवलेल्या मरणांची दैनिकाच्या स्तंभतोलातून
आनंदयात्रा काढण्यात कोणता कुटिल डावाय
पूर्ण झाला नाही का तो
कुठवर पाडणार दात दातावर
हाणून आश्वासनाच्या चवल्या पावल्या
साखर तांदूळ तूर मसूर सूर बद्सूर
गरजानि खस्ता
पानिसे खून सस्ता
कोणत्या पापाची ही पेनल्टी
यातच कुठवर जावं खपून
कुठवर खोदाव्यात कबरी मरण जगवायाच्या
कुठवर ही शर्यत उंद्रांची अस्थिर ढगाच्या सावलीसाठी

झारच्या अवलाद्यानों
कुठवर कापणार माना हातजोडी तलवारीनं
फुगतच चाललेय भरती माणसांची
माणसं मेल्यावर जाळण्यापुरण्याऐवजी
खाण्याची वेळ येणाराहे
नि माणसाचं खत मिळेल माणसं पोसण्यासाठी
किती छान छान जुलमी गंमत होईल नाही
तेच होण्यासाठी का हा षडयंत्राचा पाया
कुठवर शोषणार अेसीमधे आमचा तप्त उद्रेक
कुठवर चघळणार हाडा हाडाच्या कुल्फ्या
कुठवर ह्या मुठी राहतील मोकळ्या आकाशाविना
कुठवर आत्म्यातली जमीन पहात / ऐकत राहील
आ वासून
अविरत धडपडणाऱ्या पायांची प्रकरणं

# नऊखणाची आठवण

आठवण नं. १

शपथेसाठी
छातीवर तिने
क्रॉस काढलाच नाही हातानं
माझ्या हातात हात देऊन प्रेमळ
डोळ्यात डोळे बुडवून करूण
ओठात खुपसून घ्यायची दाभणी करकच्च
मुलखावेगळी शपथ भंगायची
जेव्हा मी चुंबायचा तिचे मौन
अलगदपणे



आठवण नं. २

समुद्राच्या खारेपणाला
साक्षी ठेवून तूमी मिसळले
तुझेमाझे समुद्र एकमेकात
नि पाहीलं एकमेकाचं अथांग रूप
समुद्रासारखं

आठवण नं. ३

मुक्त केसाकेसाची
स्पर्श-शपथ घेत असताना बोटे
ओठानं उडवलं बूच ज्वालामुखीचं
मुठी भरभरून घेतल्या धावत्या धापा
कापराचा फरफर पेट झाली केळीची बाग



स्फोटागणिक उसळणाऱ्या लाव्हयानं
सरतेशेवटी केलं अग्निजन्य सारं
स्वदेहासकट

आठवण नं. ४

जड हृदय
जड पावलानं
परतले तुझ्या आळीतून
पाठीवर तुझ्या डोळ्यांचे
खिळे ठोकणे ऐकू आले
एकाकी तू तिकडे
एकाकी मी इकडे निपचित
अंधारी दुराव्यातूनही तुझे
कूस बदलणे ऐकू आले

आठवण नं. ५

तुझ्या चोख डोळ्यांच्या
दुधी पडद्यावर बाव्हली होऊन नाचताना
शिवली नाही कधी तरळ ओल
वा
दिसला नाही गस्तेला पेंग व्याकुळतेनंतरचा
वा
दिसले नव्हते अक्षांश रेखांश तांबडे निळे
रजनीगंधा सारख्या
सुवासिक शुभ्र आसावरी रागाचं
अस्सं होईल असं वाटलं नव्हतं

आठवण नं. ६

तुला दिवस गेल्याची बातमी कळल्यापासून
ते
तुझ्या बाळंतपणापर्यंतचा प्रदीर्घ विरह माळरानी
एका वेडाच्या झटक्यासारखा झपाटलेला
त्या झपाट्यातच झेललेला
मी तुला व्याभिचारी ठरवत
तू स्वत:लाच ओरखाडत चरफडत
इतकं असूनही त्वा खोडलीस सही चर्चमधे केलेली
हिरव्याशार पानातून डोकावणाऱ्या
अणुकुचिदार काट्याच्या गुलाबासाठी
ज्याने यावे
नि तोलून धरावेत तुझे अश्रू
नि मोडून काढावा सहीनं दाखवलेला अंगठा
तुला धीर देऊन
जरी चर्चमधे
तुझ्यासोबत सही केली नसली तरी

आठवण नं. ७

लुसणारे ओठ पोटातच होते
तेव्हा लुसलं माझ्या बोटानी
आता ओठ जवळ आहेत अत्यंत
बोटं दूरदूर झाली आहेत अत्यंत

आठवण नं. ८

लहान मुलाच्या
हातात मावतील असे तुझे स्तन
तुझ्या कडेवरच्या मुलाला पाहून
वाटू लागलंय
ते हात माझे नव्हते

आठवण नं. ९

माझ्याकडे
तुझा एक फोटो आहे
त्यातलीच साडी आज तुझ्या अंगावर पाहिली
एकदम जुनी फिक्कट निस्तेज
तिच्याप्रमाणे तूही
तेव्हा फोटोत छाती यावी म्हणून
साडीचा पदर घट्ट लपेटावा लागला होता
आज लपवण्यासाठी
मुद्दाम सैल धोळदार घेतेस
तरी दिसते छाती

# या रोजगाराच्या चांदण्या

या रोजगाराच्या चांदण्या
हातात पडताच मूल्य हरवून
दगड होणाऱ्या
दगडाचीदेखील किंमत न उरवता बाजारभर
फिरणाऱ्या फिरताना
सटवीलिखीत
हिचकॉकी टच असलेला नशीबनामा
वाचण्याचा प्रयत्न करणाऱ्या पावलांना
ठेचवत मूल्य हरवलेल्या रूपानं
वा
वाचण्यासाठी काही नसतंच म्हणून
अंधविश्वासाच्या प्रवाहात स्वत:ला ढकलून
भोग भोगलाच पाहिजे
मागच्या जन्मीचं पाप न् काय
अशा रूढीबाज विधानांची षंढ पिल्लं
पुढच्या पिढीला पोहचवत
पौरुषत्वाला गंगावनं बांधत
बुजदिल हिजड्या पिढ्यांचे उत्पादन अबाधीतपणे
चालू ठेवलेले
शेवटची जीवघेणी ठेच लागेपर्यंत
काढत रहायची

धूमकेतूच्या जाती घराण्यातली लॉटरी
वा
खेळायचा नवटाकाला लागून रतनखत्री
ओपनपूर्व ते क्लोज पश्चिमपर्यंत
मूळ आकड्याच्या वनवे गिरीवर उगवती मावळतीसह
एकेक ठोका लावत
निखळवायचे वासे
वासलेली गाडगी फोडून
गाडग्याचीच माती खळग्यात भरण्याची वेळ येईपर्यंत
नि
पहात रहायचं मनीप्लँट

ही एक दररोज उचकटणारी वाढती जखम
खिडकी खिडकीवरची

जो तो अस्वस्थ
धडपडत असतो तेलन्चिंध्यांसाठी
घालत राहते पाणी मनीप्लँटच्या खुष्कीच्या मार्गांना
तहानेले दारिद्र्य
कासावीस तडफडणारे पाण्यावाचून दाण्यावाचून
व्याकुळ बुब्बुळे बाहेर काढत
लोळतच राहते
अवयवा अवयवांवर
सणासणात
अंगणाअंगणात
तहानेले दारिद्र्य मनीप्लँटच्या
हिरव्या पानापानातून

# बोम्बाबोम्ब

जन्म
व
मृत्यू
एवढंच साम्य असतं माणसामाणसात
अन्यथा वैषम्याचा बाजारहाट
तडजोडीच्या शिखर परिषदा
अहंकाराचे फणकारी फणे
कणवेची कोमेज घुसमट
रंडीबाज स्वभावाचे म.सा.वि.
दुखावलेल्या स्वार्थाचं भोंदू त्यागी नामकरण
भोगवादाची फाकती पोकळ खोल गर्त
डूखदंशी वृत्तीची नितनेमपारायणं
नैसर्गिक / अनैसर्गिक
लैंगिकतेच्या व्यापारूदीमाची भरगच्च तालीम
आपापल्या
वावटळींची धरपकड
धावपळींची वरकड रोखूधार मोजणी
अविरत शोधाशोध
पोटातल्या पाठीची पाठीतल्या पोटाची

तुझा माळा
माझा माळा
ह्यात असेच बरेच
बरेच अंतर अंतर

व्यापून टाकणारं व्याकूळ खळं

निबर निगरगट्ट फत्तर फोडून फुटत नस्तो पाझर
चढवून स्तरावर पलस्तरचे स्तर येत नाही
पोहचता आकाशाला
निनादत नस्तो नाद घाऊक संबंधातून अंतरीक
वा
किरकोळ चोर बाजार
उपरी राहत नाही संशयापासून शाबूत नि
चमनचकोट चुत चावरीच्या चकोरीनं सर्वांचं
होत नस्तं खूळ
होत नस्तं निरागस पापणीच्या पिपाणीने पाणीपाणी
लाच खावू सोज्वळ
ओठातल्या जिव्हाद्वयावर नाचवता येत नाही जीव जीव
बदलत्या मेंदूच्या अमीबायी
कळा /अवकळानं करता येत नाही प्रत्येकाचं लक्ष्य
प्रत्येकाला भक्ष्य

खुळखुळून तुटतात घुंगरू
उतरतात नथी
आटतो शुभ्र लाव्हा
तडकतात कचकड्यासारखे संगमरवर
होतो दाफोसदाऊ आयुष्याच्या इमारतीचा
तेव्हा जाणीवेला फुटतात हिरवे / कवळे कोम्ब
आपलेच मरण
आपल्या जिवंतपणी ठोकीत असते आळी आळीत
बोम्ब बोम्बा बोम्ब

# प्रियदर्शनीच्या मृतात्म्यासह सकळांस

ज्यांच्या इशाऱ्यावर
तयार वाऱ्यावर
सोडून देण्यास त्यांचे ते
सर्व सर्व
असे का मानणार नाहीत तुमचा तसा इशारा
ज्यात कुणाचेच काही वाऱ्यावर
विस्कटण्याची गरज नसेल
बिनवारस पडलेल्या गवताच्या पेंढीतलं गवत देखील

इशारा देणाऱ्यांच्या मानसिकतेचा शोध कसा बरं घेता येईल
त्यांच्या स्वार्थात
लपलेला छुपारूस्तुम दुर्गन्ध कडीकोट बंदोबस्तात
ज्याचा हुंग लागू देत नाहीत ते
कशाकशानेही कुण्णा कुण्णाला
असे का
यातलं किती सांघिक
एखादा आदेश / संदेश देऊन / भिनवून रूजवता
परिणाम नी फायदा हेरूनच ठेवलाय त्यानी
प्रियदर्शनी
तुझा अमानुष / अनैसर्गिक मृत्यू
ही तू पोसवलेल्या
सांघिक सेक्यूलेरिजमच्या हातून
वैयक्तिक सेक्यूलेरिजमची निर्मम / निर्घृण हत्या

अल्प हंबरड्याची केलेली गय
त्यांना दिलेली लगेच दाद व मान्यता
त्रैराशिक: मतपेटी / खुर्ची / सत्ता
हे असेच चालू राहिले पुढे तर
संस्कार / अभ्यास / परंपरा / इतिहास
यांना न्यायालयात बोलवायला हवं उलट तपासणीसाठी

धर्मनिरपेक्षतावाद
एक प्रश्नचिन्ह
माझ्यासह माझ्या देशाच्या अंतर्बाह्य
व्यापून उरणारं

# मीच मढं मीच स्ट्रेचर

मीच मढं
मीच स्ट्रेचर
असा हा घातकी जन्म व सुतकी प्रवास
जोवर
माझ्यातलं मढं मरत नाही
पाठीतलं स्ट्रेचर जळणार नाही
तोवर
या तिरंगी कफनातून होता येणार नाही नागवं
जोवर नागवा बलात्कार थांबणार नाही
हे हे भलं थोरलं स्मशान पेटल्याशिवाय
कुण्णा कुण्णालाच स्मशान मिळणार नाही
रोजच्या या मरण चक्राला
गति देणाऱ्या इंधनाचंच इंधन बंद केले पाहिजे
१२ महिने १३ काळचा गरोदरपणा याला
सुकाळ दुष्काळ न पहाता प्रसवणं याचं
उंदरांच्या शर्यतीत उंदीर
रोज फुगवटा वाढता उद्रांच्या महायात्रेला
खरंच नसबन्दी-तांबीनं हे थांबेल का
किती भ्रष्ट बोथट कानोसा हा या सैतानी प्रश्नाचा

प्रत्येक क्रियेप्रियेत
आपण मरण मरत असतो
अन्
उगाचच आव आणतो स्मशानातून परतताना
एखाद्या ओंकाराला धूनी दिल्याचा
एखाद्या क्रॉसपक्ष्याला कॉफिनमध्ये झोपवल्याचा
एखाद्या हिरव्या चंद्राला जनाजा बहाल केल्याचा

# सुजा डी न्यूड

*चिपळी नि एकतारी*
*भजनातून दुनिया सारी*

*पवित्रतेनं मढवलेला*
*गच्च रेशीम किडा पहारेकऱ्यासारखा*
*पाठीवरची अर्धवलये दावत देत दावत*
*उपडा गिरणीच्या तोंडावर सावध / अहिंसक*
*जाणीवेत*
*बांगड्यात किणकिण*



तडफेनं किणकिणणारी आतल्या आत
खारकेची रेघ
लवलवणाऱ्या पापणी संगमामधे
ओठानं दुभंगवता संगम
टप्पयात आले गुहाघराच्या तळघरात
पेटलेले चांदणी तळे
जाणवला चेहरा
जाणारा भाजवून वाफेचा उष्ण फुफकारा
तिसऱ्या डोळ्याच्या आंधळ्या बुब्बुळाचा
तप्त बुंदगुंजगुंजाळ



बेडूक पोट येत धीम्या चालीनं उतू
झाले बेडूक पाठ पाठीवर
केंद्रीकरणाचे विकेंद्रीकरण
विकेंद्रीकरणाचे केंद्रीकरण
ठिणग्यांचे राजरोस अभिसरण
पोहू लागले नवरस रस्सीखेच खचाखच

दुधी वारूळांचे डोळे अंध तट्ट स्पर्शज्ञानी
पहात नग्नता नग्नता सोलताना माझी
भुरळ पाडणाऱ्या सिलोनचे कुरळ केस
पुढच्या अंगणी उसास्यागणिक थरथरताना
हजारो हजारो बाक शुभ्र / अमिश्र
चंदेरी चंद्रमणी कारंजेनर्तन
तांडव पेशी पेशी
चित्त चित्त चीत चीत
पटावर पट पटापट
गाभाऱ्यात घणघणत
राहीला घंटा गाभारा दुमदुमती पंढरी लय /
वलय / प्रलय /
तळहाताच्या रडण्याने
भिजलेले तळहात एकमेकात
काचत गेले पालथे उपडे
पेटलेले चांदणी तळे कह्यात घेत
विझवत सुटले कुतुबमिनार ७ मजली
राहिले वाजत
दिगंबर दिगंबर भजन
शुभ्र दहीकवड्या निरोपाच्या
देऊनही नसानसात

# हुबलाक

दातानं खर्बडून खर्बडून प्लास्टिक मांस
नरड्यानं खेचून नळीतला बोनमॅरो
फेकून दिलंय गूघाणीत निकामी म्हणून
लोकशाही प्रजासत्ताकातल्या भारतीय जन्तेस अन्
पुन्हा कसायाचा जड शीळ डेळ्ळीसुरा
आवरणं पांघरून पंचवार्षिक
उभा ऱ्हातो खुज्याखरज्या खुरांड्यापाशी

दसबोटी सलाम नि कपबशी हसू घेऊन निलाजरे
महारोग दमा सिफलीस गणोरिया टीबी गोणपाट गरिबी चिंपाटाची
तोंडपाठ झडती घेत
आश्वासनाच्या सपटलोशनी डबीत सर्वासर्वांसर्वांना कोंडत
ढेकणीस्वभावी खुर्ची नि सोज्वळ शोषणी सत्तेच्या हसिलीसाठी
एखाद्यानं केलेला अन्याय लवकर पोपडे धरतो गांडू शिकवणीच्या
नीतीमत्तेत / म्हणूनच नेहमी गंडत आलेले आपण भ्याडगांडू कळप
ज्या दमेकऱ्याना टाकता आले नाहीत समाधानकारक उसासे
स्वातंत्र्याच्या  भगीतही वा घुसळता आला नाही सेक्सला
प्रगतीच्या संकरित कलमी रोपट्याच्या आदाना प्रदानासाठी
नि हे शेंबूड शिंकरावा / बेडका थुंकावा
तसं थुंकतात खाकखाकरून तुमच्या आमच्यासह तात्विक मुल्यांना
त्यांची निर्ढावमय झालेली गेंडकातडी लेप्रोसेटिक डगले अडकवून
पोसतोय सर्पीपिलावळ विषारी सर्पी अंतःकरणासह
प्रत्येक सामान्याचा मतपेटी बळी करून
अर्धमेली सडवताहेत उवापिसवा गोचड्याजळवा
थान पी म्हंटल्यावर चोटाला तोंड लावणाऱ्यांची अक्कल
काय भलं करील या देशाचं / ज्यांना आपल्या लंडसावलीचा पुढचा
विचार जमत नाही त्यांच्या वडसं वाढलेल्या मेंदूच्या डोळ्यात
अस्तं फक्त भोंदूगिरीचं अनग्न शिल्प ।।बुवाबाजी।।
ज्यावरचा बुरखा फाडणाऱ्यांचे हात छाटले गेले बलात्काराच्या
आरोपाखाली / त्या सावलीत जे येतील त्यांचा आरबाट फडशा पाडला
सद्याही पाडीत हे सुस्तावलेल्या अंडासारखे गपगार
भावनाहीन गाल गाडग्याच्या चेहऱ्यानं
अखिल मानवी चिंतेनं झपाटलेल्या गुर्जर गांधीचं घड्याळ
माझ्याच कमरेला आहे अशा तोलदारकीनं मिरवताहेत
हुबलाक

# डेली या ...

डेली
या दुखाःचे नूतनीकरण जांभई दर जांभई
होत असते
सूर्याच्या आरशांत
पांढरंफटक कपाळ पहात
वाढतात विधूर ठोके
अनिश्चिततेवर
असाध्यतेवर बाव्हल्या बाव्हल्यांचे
ही गूढता व त्यातली बाळंतपणं
मरणवाटेने भणंगासारखी

जगवत असतात खरीप हंगाम
सगळी दारोदार बिडीच्या एका झुरक्यासाठी
व्यक्त केलेल्या लाचारीत अडलेली
हे चालणे नव्हे
हे थांबणे नव्हे
हे रुतणे तळागाळातल्यांचे दिवसेंदिवस गटारगाळात
जर्दजर्द जर्दाळू दुःखावर
यांची सर्द सर्द सर्दाळू सहानुभूती
जिला कवडीची किंमत नाही
वा कवडीही लागत नाही देण्याघेण्यासाठी
इथे झालेला प्रत्येक प्रेषीत नकटा
त्याच्या बुध्दीची तोकडी वीडी
नि संप्रदाय निर्मिणारा धूर
सोलतोय आमची कातडी आजवर
आमच्या पायी दिलेली चप्पल आमच्या नंबरची नाही
आमच्या मापाची ते दडवताहेत
आम्ही अनवाणी आहोत अनेक अनेक वर्षाचे
पायाने
डोक्याने
संस्काराने
संस्कृतीने
साहित्याने
सर्व सर्व सर्वांने
आता एकच चप्पल आहे
आता एकच छप्पर आहे
आता एकच पुस्तक आहे
अखिल रक्त कल्याणाची बूज राखणारे

# गोंधळ्याच्या संबळलयीतून

गोंधळ्याच्या संबळलयीतून
बोटांच्या संकेतावर नाचणारी
हेळव्याची भाषा—
पालवलेल्या सावळ्या कातीच्या
सतेज डोळ्यात वसणाऱ्या
आतूर गर्भाशयात
ध्वनी शब्दातून
कवेत न घेता येणारा प्राणापलीकडचा प्राण
उतरवण्याची किमया असलेली

माया अंगासकटची निर्वस्त्रता
स्वच्छवते
धूळ वटलेल्या देहाचे आरसे
तर्जनीच्या एका खुणेनं
लखख दिवेलागण हाडाहाडात पेरत
पेरापेरानं
हे बोल नसलेले स्पर्श
अंधत्वासारखे फिरत राहतात
रस्ते चुकून शरीरभर
हिच्या तालावर
शतसूर्यांची दाहकता पोसवतात
मातीचे पुतळे
पापणीच्या उघडझापीत
उघडझापीतल्या समुद्राची गाज
ऐकवत राहते
संथ वाहणारे तारांगण
तद्रूप होऊन हिंदकळणाऱ्या लहरींना

तारांगणाच्या पांढऱ्या फिक्कट हास्याची
मदाड सरपट उत्सुक होण्यास शिवकळा
झरण्यासाठी पृथ्वीच्या रेशमी पन्हाळीतून
टळ / अटळ
अशा दोलायमान शेषमुकूटावर पहुडूनही
नवरत्नी
नवरंगी नक्षीकामाचे काठ असलेले
हे देहधारी आरसे
गर्जवतात
झांज नि टाळ
मृदंग नि सनई
आसमंत पेटवून सोडते ही संगीताची पहाट
रागदारीच्या डंखातला



रस / रंग शोषत भरत
हा रितेपणा अद्वितीय
निखळवत एकेक मोरपीस
फुलवतो समाधानाचा मोरपिसारा तुडुंब
नि
लेण्याची गूहा
ओठ मिटत सामावून घेते
एक एक मूक लेणी

लेण्यालेण्यातले नंगं अप्रतिमत्व पाहून
थयथयथयथय नाचते
हेळव्याची भाषा
बोटांच्या संकेतावर
गोंधळ्याच्या संबळ लयीतून



# एक गाभण गर्भाशय सदोदित

।। एक गाभण गर्भाशय सदोदित ।।
उंक्ती वा कृतीची दाभण टोचेपर्यंत
टोचून फोडेपर्यंत
वाट पहात राहते बाळंतपणाची
बाळंतपणात हिच्या होतात वेणा माण्साला
माण्सातल्या माणुसकीला

ही प्रसवते कळप कोंडवाडे नखानखावर
धडावेगळी करून शिरं

शिरांच्या जागी रोवते झेंडे
झेंड्याची फडफडती उरं देतात घोषणा
घोषणा होते तलवारट्युबला इटॲसिडबल्ब जाळपोळ
लक्ष लक्ष सैतान नाचवत बुब्बळात
बुब्बुळाना देते हुकूम झडतीचा
आपल्या तुपल्यांच्या
नि
कर्कश किंकाळ्या फुटतात रक्ताच्या बुडबुड्यावर
करून हात मिळवणी हिटलरशी
ही चेटकीण कढवते निरापराध मटणाची प्रामाणिकता
लावून शर्यत हृदयाच्या ठोक्यात
नि पायाच्या धावपळीत
बदलते वेळ मस्टरवरच्या सहीची
व कडीकुलूपात चिडीचूप दडीमारण्याची
करून गारढोण थडगे भयग्रस्त मेंदूमेंदूचे
निथळवते त्याला त्याच्याच धर्मग्रस्ततेतून
मूक प्राण्यांच्या चिन्हांत अडकवून माणूसपण
बघते त्यांच्या हिंस्त्रतेला लाजवणारा देवनार
दडपणाने निर्मनुष्य करते रस्त्या रस्त्याची कांबळ
नि घेते कानोसा आसुरी सुरावटीच्या संथ चाली नं.
जन्मवते स्वतःलाच एखाद्याच्या उद्धारयोनीतून
शाबूत राखून उद्धारयोनी कापत सुटते डेडळे कोथळे कावळे बगळे

ही दंगल
एक मादी
एक गाभण गर्भाशय
अनेक झवत्यांची रांड

# क्रांती क्रांती एक ××××××××××

क्रांती

क्रांती एक
हास्यास्पद शब्द करून सोडलाय
इथल्या मातीनं
क्रांतीची भाषा भाष्यातच ती
भाष्यापुरती क्रांती
विश्लेषणा / पृथ्थककरणानंतरच्या
मुद्दाम योजलेल्या वेडगळ फुसक्या आयोजनातच
मारून उठतात भाष्यकार दारिद्र्येषेवर
जोरदार ढेकर देत
हीचा उद्घोष आपल्या स्वार्थासाठी / अर्थासाठी

झुंडी / समूह / घोळके
घोषणा / घेराव / धरणे
यांनी आता हलत नाही पान
तर कुणाचे होणाराय झ्याट वाकडे
बंद होत नाही जोवर हगणे
नि त्यासाठीचा डाव्याचा वापर

डावखुरे कणांकणांतून जन्मवण्यासाठी
तडे तडे जाऊ पाहिजेत
आतड्या आतड्याला
तड्यातड्याचे होऊ पाहिजेत नखशिखा इंगूळ
तेव्हाच गाणे उसळलेल / उफाळेल
तोवर उजवे उजवणार इथे नवऱ्या
भाजणार पोळ्या डाव्याच्या करून गोवऱ्या

मला जाणवू लागलेय तुझी
ओंगळ भोंगळता सद्या

# पूर्व उत्तर दक्षिण सह इतर सहा

*पूर्वउत्तर दक्षिणसह इतर सहा*
*सर्व पश्चिम झाल्या आहेत*
*दिशाहीन पावले*
*देशीत बुडत ऐकत रहायची*
*पहाटेची ढगाळी सांद्र धून*
*हुंदक्यात गोठलेले ध्येयाचे हंबरडे*

कधीच न पाहिलेल्या प्रेयसीसाठीचा आक्रोश
तर्रर डोळ्यांनी
तरी खरडून खरडून कागदात स्वतःला
देत राहिलो याद
यूज मी म्हणणाऱ्या कचरापेटीची
सगळे आवेश
अभिनिवेश
योजना / धोरणं
झगडत राहिले स्वतःला कमजादा करत
खाणावळीच्या ताटात
झडत गेली यांच्या अंगावरची बेकरी
फिटत गेले हे उसनवारीसारखे पेपरवेट खालून
हे सरमाडी सांगाडे
टांगत सुटलोय क्षेत्राक्षेत्रातल्या
पारश्यांच्या विहिरींवर
आकाशाचा गिधाड घारींचा ताफा
कुरतडीना झालाय अमीबाहीन देहाची हाडे
या खनिजानं भागवता येत नाही
पंचतारांकितातला खर्च
म्हणून तयार होत नाही इंद्र
बड्या बड्या पदाच्या गाद्या ढुंगणाखाली सरकवण्यासाठी
वा
तयार होत नाही अधिकारी जल
शिंपडण्यास दोन शिंतोडे सहानुभूतीचे
वा
घालत नाही वायू
एखादी कोरडी फुंकर जखमेच्या चिरेत

वा
मातीही होत नाही लेपण सारवण
वा
कुडकुडणाऱ्या दारिद्र्याप्रत पोहचत नाही
तेजाचा शेक
ह्या वावटळी सभोतालच्या
धावत पळत राहतात चूल नि खाटेची मूळे घट्ट रोवण्यासाठी
अशा ह्या चौखूर उधळणीत
एकांताचीच बहर वाढवणारा
एकांत राबवत उरात मर्जीविरूध्द
अधू होत चाललोय मी

हे हाब खाणे जीवाचे
हे रखडणे पायाचे
हे भिरभिरणे डोळ्याचे
हे डहूळणे पोटाचे
हे पासलणे हाताचे
देहातल्या पुल्लिंगी छेदा छिद्रासह

अजून लागण तितकीशी
फोफावलेली दिसत नाहीये सुग्रासरित्या

ही बावनकशी बेकारी
ही शंभरनंबरी लाचारी
श्रीमंत होत चाललेय दिवसेंदिवस
माझ्यातल्या सूर्योदयाला
सूर्योदयाआधीच मावळतीचे लेबल चिकटवून

# डाक्यूमेंट्री

*शीर्षक : नशीबनामा*
*लेखिका : सटवी*
*दिग्दर्शक : हिचकॉक*
*प्र.भू. : भारतीय*
*जात : रहस्यमय*
*निष्कर्ष : अंधश्रद्धा*
*निर्णय : विद्रोह / नकार*



# अश्वमेधी सप्ताश्व

पिकत नाही डोक्याचा चिंतेनं
वा
भिजत नाही पापणीचा सुद्धा एखादा
वा
हलत नाही पोटातलं पाणी
वा
शिवशिवत नाही मन प्रश्नावळीवर
वा
फुटत नाही अंगठा महारोगाला
वा
शिंपत नाही कुणी अंगण शेजारी
वा
कळत नाही त्यांना सर्व कळून  देखील

तरी
अंगावरून जातात ते एकमेकांच्या
तरी
वाचतात ते छापलेले एकमेकाला
तरी
सोसतात ते कापाकापी एकमेकाची
तरी
भोगतात ते टिनटपरी आयुष्य एकमेकासारखं
तरी
घालतात पिकू गर्भ तेवढाच आनंद म्हणून
तरी
करतात प्रथमोपचारापर्यंतची धावपळ नित्यनेमाने
तरी
वाढवतात ते वावटळी लक्तर वक्तर
तरी
देतात ते खांदे आळीतली मंडळे जोपासत
तरी
जगतात ते चौकटीत
चौकटीच्या सीमेवर
चौकटी चौकटीचे कोन मजबूत करत

त्यांना भ्रांत आहे
फक्त विस्कटलेली जुल्फे सावरण्यासाठी लागणाऱ्या फणीची
त्यांना भ्रांत आहे
फक्त धूलवडलेले देह धुण्यासाठी लागणाऱ्या न्हाणीची

विचाराची झेप खुटत चालली आहे
नाळे नाळेतली गाठ सुटत चालली आहे

श्वासातला वारा फाटत चालला आहे
काळजातला झरा आटत चालला आहे

सगळ्या निसर्गदत्त प्रेरणांचा ऱ्हास होत चाललाय
एकीकडे
हे घडवणारे प्रदूषण कुठून घुसतंय घराघरात
दुसरीकडे
का वाढत चाललेत तुकड्याच्या मागणीसाठी तुकडे तुकडे
ही विकृत कृती
अनेक वर्षे गुलामगिरीत जगल्याचा परिणाम
की
दुसऱ्या महायुद्धाची सिल्वर जुबिली / गोल्डनजुबिली
नाही
तर मग कुठं चुकली पाकविद्या
का चावी द्यायची राहिलेय प्रमाण वेळेला
कुठे चुकलाय भृगूशास्त्राचा अटळ आडाखा
का इतिहासाला द्यायचीय झणझणीत फोडणी
भौतिकाला जमणार नाही का एखादे तोडगा-सूत्र
मख्ख भूगोल सोडून तंद्री का फुटत नाहीए सत्रा तोंडानं

कित्ती तरी भिजत घोंगडी
कितीतरी प्रश्नांचा रोज करोडोने ट्यँहाट्यँहा

का आपणच करत सुटलोय छिन्न-विछिन्न
अश्वमेघी सप्ताश्व

# जन्ममरणाच्या दातेरी चाकावर

जन्म मरणाच्या दातेरी चाकावर
रोवून आपले दात
ही ध्येयाची दाढी
भूरूभूरू उडत चालत असते
खळग्यातली आग पोसत
व
कधीच दारिद्र्यरेषेखाली न जाणारी खाज
भागवत अशी तशी
काही गोष्टींचा आव आणता येत नाही

वाटेसाठी किमान पाय तरी असावे लागतात

बोच्यानं लाह्या भाजता येत नाहीत

ज्याची धून अद्वैत
ज्याचा अभ्यास शक्तिमान
डोकं फुटो वा भिंत तुटो असा
त्याला
व्यसनं / सवयी
कोणतीही झवाझवी
वा
विष
मारू शकत नाही पोहचण्याआधीच इप्सिताजवळ
इप्सिताना जगवत असतो वेडापिसा ध्यास
ज्याला अभिप्रेत नाही आत्महत्या
वा
मंजूर नस्ते मरण
तो नसतो समर्थक षंढ मार्गांचा
वा
उचलत नाही वाटा पळवाटांचा
त्याच्या शेवटच्या श्वासापर्यंतचं भांडवल
अडकत नाही ठोक्यात
वा
सुटत नाही पडजिभेखालून
आकाशाचा विजयी पताका फडकविल्याशिवाय
घुटमळ डोळ्यात
पेरून सुगंध

# तुरूपचे पत्ते

माझ्या भग्न मनाच्या वाढदिवसोत्सवास्तव
माझ्यातल्या पिशाच्चानो घाला पिंगा
माझ्यातल्या हडळमायानो धरा फेर
ह्या ऐन्यातून निखळवा एकेक प्रतिबिंब
नि
करा मोकळ्या

आठवणीच्या टकल्या
पुसा त्या जागी वाळलेल्या आसवांना
करा अपहरण
माझ्यातल्या माझ्यासह
माझे सर्व
कोणत्या मोहापोटी
मी अजून गुलाम असल्यासारखा
कोणत्या मदिरेपोटी
ढळतोल नसानसात खेळवत फिरतोय त्याच आळीत
का उमटवतोय येर झाऱ्यानं पावलं
तिनं थुंकलेल्या थुंकीवर
हा एक गूढमय हुंदका
जो फुटत नाही
जो बोलूही देत नाही
जेथे आहे तेथे नसल्यासारखा
हा आस्तिकपणा खोटारडा
ही माझ्यात नसलेली तुझी ओढ
ही दिखाऊ अंधश्रद्धा
हे भ्रमात टाकण्याचे / ठेवण्याचे खेळ
हा डूख माझ्या सचोटीवरच्या ओरखाड्याचा
पिशाच्चानो
हडळमायानो
मुक्तपणे बिहरासंचरा माझ्यात
नि
सांगा तिला
माझ्या बुरख्यातल्या बोटांनी बदललेत
तुरूपचे पत्ते

# यक्षगान

किती युगापासून हे असे अखंड अविरत सतत
अजून यक्षगान चालूच आहे
यक्ष यक्षिणीच्या
त्यांच्या नात्यातल्या कुणाच्याही पाया पडणारे लोकही आहेत
१० नवकोट नारायणाच्या कोटात ८० कोट
अशी स्थिती पोसलेय प्रतिक्रियात्मक ३२ चवल्याच्या बोमाट्यानी
आम्हीच वैरी झालो आहोत आमचे वांझोट्या वाचाळाने
शिव्या देत
बोटे मोडीत
मोडीत काढून घेतलंय आयुष्य
हे बदलणार नाही का
हे थांबणार नाही का
कुठवर ह्या निंबलोणात हाताची घडी तोंडावर बोट ठेवून
करून घ्यावा आयुष्याचा थयथयाट



# म्हणजेच

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्र. 2543
नोंद 9/6/86
संदर्भ शाखा (स्वतंत्र प्रत)

जिवंत राहण्यासाठी
प्रत्येक दिवसास झवावं लागतं
ज्याने याची सोय
भरभक्कम केली आहे
तो रोज दररोज
नवरतन कोकीन तांबूल दाढेत ठेवून
पलंगतोड करतो द्विसाची
नि
दिवसही
दिवसाढवळ्या निर्लज्जपणे
बोभाट्याची तमा न बाळगता
पूर्ण आरामात होतो नागवा
व
देतो मनसोक्त उपभोग म्हणजेच

# हे सांडपाणी

हे सांडपाणी माणसाळलंय
वा
ही माणसे सांडपाणळलेत
एकमेकाच्या पूरकतेच्या निकडीचा हा व्यवहार
की
कोणताच पर्याय नसलेल्या वांझ कापडी जिभांनी
घातली आहे ही अमर संक्रांत
कोणतीच कोय
पेरता येणार नाही का तोडगा / सोय म्हणून
अनेक कुत्र्या मांजरांना
जगवणारा टाकावू चोथा टाकणारे
का अळणी आळवणी भाकताहेत अजून
कुत्र्या मांजरापेक्षा निकृष्ट दर्जावर स्वतःला तगवत
फुटपाथाची रया नाही चेहऱ्यावर
झाडाची माया नाही अंतःकरणात
फक्त मनीऑर्डरची चिंता
झडणाऱ्या मांसाची झडती
भांडी की चिंपाटे
भिंती की गोणपाटे
कुठवर घट्ट आवळून आपल्याच हातानं आटे
या चक्राभोवती घेणार आहेत करकचून
झुगारून निसर्गाच्या अनेक प्रयत्नांना
खाटे खाटेवर जगताहेत रोग
तरी निढावलेले ठोके
निमवतात भर सांडपाण्यासाठी

# कुंद कोळपट (धगधगता) कोनाडा

कुंद कोळपट कोनाडा
होत चाललाय माझ्या आकाशाचा
जाळी जाळी होऊन हलकीशार
गळू लागलीयत सोनसळ पाने
गंजू लागलेय चंदेरी साखळ रक्तातली
अपयशाच्या रातरपेटीची चौखूर घोड दौड
तप्त तप्त करत सुटते विद्ध थेंब थेंब
नि टणक टणक दुखावलेल्या धमन्यात
नांगरत / पोखरत
उस्कटत शिरते माथेफिरू सणक
दिवसभराची चेष्टिते
भराभर कोसळतात पेटत्या अंथरूणात
घेत हवालदिल झोकांड्या
माझ्या ध्येयाचा अनिवार्य आग्रह अटळ
करतोय लुंग्या सुंग्या रस्त्यावरून
तरी मला तडीपार
माझ्यात नसलेले
राजस सत्वाचे १०० % ढोंग / नकला
पार पाडत राहते माझ्यातली मीरपुड / मिरची
मी कधीच थुंकलोय तळहातांच्या रेषांवर
सटवीला पासलवून पासलवून
उस्कटून टाकलेय नवूग्रहाची खाट
फोडत पिढ्या देव / देव ऋषींच्या

मी नकाराचा आस्तिक
मी विद्रोहाचा पाइक
मी भन्नाट / सुसाट नावर थैमान
वावरतोय वणव्याला गर्भार ठेवून

# इथिओपियन मरण

*इथिओपियन मरण*
*मरण मेल्यानंतर पामेरियन कणव घेते उड्या*
*मानवतेच्या अखिल हृदयाला*
*लक्ष लक्ष भेगा पडल्यासारखी*
*ज्यात*
*तरी म्हणता येणार नाही नसतो स्वार्थ*
*वा*
*नोबेल लक्ष्यभेद करण्याची वृत्ती नि पूर्वआयोजन*

# आल्बेर कामूस

चहुभोवती

आत्महत्या होत असताना
आत्महत्येच्या नांवाखाली
हत्या पचत असताना
माझ्या स्वप्नांना फुलवण्याचे स्वप्न कसे पाहू
ह्या क्षणापासूनच
स्वप्नांनीही आत्महत्या करायला शिकलं पाहिजे

तुझ्या तात्विक बैठकीच्या पायाकडे
सर्व कळत न कळत वळतंयस वाटू लागलंय

# अचेतन तळातला

अचेतन तळातला
कल्लोळ ऐकू येतो जेव्हा
मौन चेतनात
तेव्हा
जडावतं हृदय
येतं उधाण भरतं
गुदमरतात गात्रंगात्रं
निःत्राण होत जातो त्राण त्राण
पापण्याना पेलवत नाही साधा ओलावा
कंपकंप होऊन जातो धमनीधमनीचा



कोसळतात गुजरलेले रात्रदिवस एकवटून
बघवत नाही ढोंगासोंगांची तडफड
वृती / प्रवृतीचे
संस्कार / संस्कृतीचे पडतात मुडदाखच
गारद होत जातो संचयीत केलेला क्षण क्षण
उघडी नागडी भुतं होतात वादावादाची
अर्भकापेक्षा नस्तं कुणी मोठं नी खरं
हे पटू लागतं तेव्हा
अचेतन तळातला
कल्लोळ ऐकू येतो जेव्हा



# शब्दा हे शब्दा

थकलेल्या इंद्रियांना
का ओढ वाटतेय अजूनही
गुफांची / शिखरांची
चढांची / आकाशाची
ज्यानीच केलेय माझी चंद्रमौळी
फेडलंय सत्व टिंगलटवाळीसाठी

का लांबणीवर पडत चाललंय सुख
दुपारच्या वेळी देखील
आलं नाही ते पायात सावलीसारखं

बेत / आडाखे / धोरणं
जमिनीविना अधांतरी
आकाशाविना छत्रहीन / एकलकोंडे
कोंडवाड्यात जोडीदार नसलेल्या
हंबरड्याचे बेंबीपासून फेसाळ फुटणे हे
चौभिंतीवर
फुटून ओघळणे फुग्या फुग्याचे : घनदाट निरुत्साह
ओघळून ओघळून वाळणे
डोळ्यातल्या डोळ्यांत रवंथ

हा शब्दाचा नाद
ही शब्दाची दोस्ती
हा शब्दाशी साधलेला संवाद
हे शब्दलग्न
ह्या महागाईनं महाग लागलाय हा सुरशिनगार
ज्याने भरता येत नाही खळगा

वा भागवता येत नाही मैथुन

तुमच्या डोक्यावर आरोप करतोय का मी
लोप पावताना
का भाजले नव्हते हात या बिजलीचे
रोप लावताना
इतक्या दूर आल्यावर का घडलाय असा विषम संचार
आता घेता येईल कसा घटस्फोट
ह्या संबंधावर अनैच्छिक खार खाण्यास भाग पाडतेय परिस्थिती
आता अशक्य आहे वेगवेगळे प्रखर नांदणे

शब्दा
कसा विसरू अपयशातली दर्जेदार सख्य सोबत
त्वा फोडलेले गळूचे तोंड
करून दिलेली वाट
अन् अंथरलेले अगाध माध्यम
शब्दा
सगळ्या जगापेक्षा
जगातील सर्व सौंदर्या / किमयांपेक्षा
जास्त जीव जडलाय तुझ्यातल्या अर्भकांवर
हे शब्दा
तूही इतरांप्रमाणे ह्या आणीबाणीत
परक्यासारखी करणार नाहीस ना चौकशी
औपचारिक सुरात मोजकी
अरे माझी मैय्यत ही
शब्द कफनातच न्या
ही शेवटची इच्छा

# एका मौनाने

एका मौनाने
दुसऱ्या मौनाला
द्यावी शपथ मौनाचीच युगांतापर्यंतची
नि वाऱ्यानेही अंथरावी कांबळ एखाद्या झाडाखाली
विसाव्यासाठी निपचित
नि सुगंधाने बांधावी गाठ आपल्या शेंडीची
करकच्च वचनाखातर
नि पाण्यानेही कापावेत पाश जड शिळ पत्थरमाळा
उरावर माळत
नि आकाशानेही झेपावे पाठमोरे फिरून डोळ्यात
भरत ग्रहाग्रहाची माती
नि तेजाने करावे लुळेपांगळे चैतन्याच्यासह सर्व
मूळ्या खोलवरून उस्कटत
नि पृथ्वीनेही सोसावे तोंडावर ठेवून बोट टेकावी
पाठ पोटातल्या ज्वालामुखीवर

# माझ्या पात्रांना

माझ्या पात्रांना
मी देतो जेव्हा संवाद
तेव्हा त्यांच्या पोटात उसळवलेल्या
आगडोंबावर देतो एकदा एक तरी ढेकर दिवसातून
त्यांची चूल शोषण व्यवस्थेच्या बेपर्वा मुतानं विझवून

[ माझं नाटक स्पर्धेला पहिलं येतं वास्तववादी म्हणून ]

माझ्या पात्रांना
शिकवतो मी मार्क्स लेनिन चे फिडेल
कोंबून त्यांच्यात चीड न्याय सम्यक लढ्याचे तत्वज्ञान
तेव्हा प्रेक्षागृहातल्या टाळ्यांचा कडकडाटच
अभिप्रेत अस्तो मला संवाद दर संवाद

[ मी मोठ्या नाटककारांच्या पंगतीतला होतो / बुद्धिवादी वगैरे ]

माझ्या पात्रांना
करतो मी बेघर फिरवून बुलडोझर नि
दाखवतो लोकशाहीतले प्रतिनिधित्व कुचकामी / लाचखाऊ
हे माझ्या सातव्या नाटकातलं एक दृश्य फक्त
अलिशान बंगल्यात बसून लिहिलेलं

[ माझी पात्रे तिथेच आहेत
तीर्थयात्रेतून मुक्त होण्याची तिथी शोधत चाचपडत धडपडत
जिथे ती होती। त्यांचे शतशः आभार ]

# बेकारी-८५

हा झोळीतला रेप
हा चहुभोवतीचा धडाधोंगडाधमामा पूर्वग्रह दूषित
हा लावसट चिवचिवाट कर्णपिसाट
ही अविरत झोपमोड करीत ओळंबणारी निशीथ
हा काव्य / दृश्यकाव्याशी संभोग
हा कल्पनातीत सुगंधी गलमुदगल आनंद
ही सवड सर्पनृत्याला डोळ्याच्या पटांगणात
ही चटक्याच्या मांडवांना आग लावण्याची फाटकी सवय
हा नागरमोथ्याचा मूलभूत ध्यास निर्भेळ
ही कधीमधीची खेळकर खेळी नी खळीची कोपरखळी
हा नस्तराच्या छिद्राला प्रच्छन्न उपदंश
ही हुलचुतीया मार्गाच्या अंतस्थ तळावरची गहाण वट



हा कातडी गोचडीच्या खेळाचा लंगरतोड नवस
हा पेटता उसळ अंतर्दालनीय उखळमुसळ काथ्याकूट
हे विकत घेतलेले झेंडूचे चेंडू नि दूरून पाहिलेले गुलाब लाजवाब
ही तुझ्या संगतीतली हयात नि यातायात

हे अवस्थे
ह्या पटलावरची कोरीव करणी अवस्थांतरणीय
हे अनुभवसिद्ध गहिरेपण मोडीत न निघणारे
तुझी माझी ताटातूट न करता
वाढवतेय
जवळीक / वय / अंमल अबाधित ठेवून
नशाभोर डोळ्यात
उन्हाच्या शोधातला पाऊस



हिरमुसलेल्या आशावादी झुळका
अर्धवट गिळलेल्या अवंढ्याचे भांडार
वांझ / सवाष्ण मुरमाची चिंता
करमुक कुमक झोटिंगी
हे अवस्थे
तू एक भयंकर गलांड
मी
अलंड / धर्मलंड तू दिलेलं न नाकारता
जगतोय
घरातल्या घरात थोट्या पिंपळासारखा
ह्या जागतिक मेषोन्मेषात
कुणाच्या मेहरमामलुतीचा झालो नाही चिकटभोकर
वा
खचू दिले नाही पागलपन आत्मभोर
हे अवस्थे
तुझ्या माझ्यातल्या अलिखित जातमुचलक्याला
येणार नाही खोडता
वा
घेता येणार नाही काडीमोड
हे प्रेरणे
हे बेकारी
हे जीवाभावाचे
कुछ लोगोंको जिंदगीसे निकाला नहीं जाता
हाँ रिश्ते बदल लिए जाते हैं
एवढाच मोहरबंद लखोटा खरा
जपत विहरेल आपल्याच मस्तीत
हा कलंदर खंड्या

# एक आंदोलन असेही

अजूनही
नाजूक व्यसनाच्या अधीन
डोळ्यातले तेजाळ
हृदयाची धडधड एकल कोंडी
मेंदूचे हुकूम नम्र / निर्नम्र

मज्जातंतूच्या संदेशाची प्रवाही बिजली
हावभाव / स्वभाव / हालचाल
कृती / विकृती / बोलचाल
साऱ्यासाऱ्यांचे बदलणे अकस्मात
वा
होणे संथ व्यवहार
अन्
केंद्र सिंहासनाचे होणे आकसून
अव्यापक व्यापकता
दृष्ट / अदृष्ट
भास / अभास
वाया न जाता वाया जाणे
आदर्श अन् तथ्यांच्या जथ्यात
हे माळणे रोज तुटून तुटून फालतू
पळ पळ करायचे गुन्हे
व घालायचेही किल्लेकोट वेढे दग्ध पश्चातापाचे
अंतर्मनाच्या गर्तेतून
मोहाची लय साकळू नये
क्रूर लोभाची नखे लाल होण्याआधी
मरत नाही या सैतानी इच्छेचे भिनणे तरी
भिनून पसरणे
पसरण्याच्या अनाकार पसाऱ्यात हरवणे
हरवून हरपूनही शुद्ध उरणे
उरण्यातलं वजा जाऊन उरलेलं उरणं शोधणे
शोधताना आपण सापडणे
आपल्याला घायळ
इच्छे विरूद्ध

# कलंदर धून

कलंदर धुनीवरचा
व्यापार धूपाऱ्यातल्या धूपासारखा
ठरेल काय क्षणिक
दिल्या दिल्या अधोमुख होताहेत सप्ताश्व पाकळ्या अन्
सैल सैल देठातले मणके
जोरदार झपाटलेय लूत झाडाला
सरळसोट कणखर वेताचा
कोण करू पहातंय धनुष्य
मगरूरीला आणू पहाताहेत हळूवार बाक कुम्भारकरानी

डोक्यातला सैतानी रकाना
हृदयाची गोंडस पाकोळी
खाऊ देत नाही मेळ धूमशान मेळाव्यासाठी
भल्या / बुऱ्या
भ्रामक मार्गाच्या आहारी
जातोय न जातोयची छाननी रात्री १२ ते २ नि
आशावादी वणवण झोपायची पालथी तडफडत
ऐकत
अपूर्ततेचे हिणवणे
पायभोवऱ्याचे गरगरणे
जाणून घेत न दिसणारा दोर
अशावेळीच का फिरतोय दिलाशाचा हात
नको असताना
हे सभोतालचे स्वार्थ
हे किळसवाणे संधी साधू साधू
का निरर्थक फुंकरी घालतायत जखमचिरात
मनन निसटून जाणाऱ्या

छापील पौर्णिमेची बरसात
बंजर करत सुटलेय माझ्या जमिनीचे खिसे
अधिकाधिक रांडाव करत रांडाव नजर
दिवसेंदिवस
लादतेय आयुष्यभराची आणीबाणी

उखडून टाकू का या वाटा समूळ
ढवळू का ही माती भूगर्भासह
बदलून घेऊ का हा जन्म
करू का निर्मूलन चांगुलपणाचं
घालू का प्रचंडपर्वतप्राय गदारोळ
होऊ का आवेगी पेटलोळ
मग किती वेळा करायचा नवीन अंत
विजेतेपदावर विराजमान होणाऱ्या
वयाचा येईल काय अंदाज
थोपवता येईल का तोवर तोफ वाटे वाटेवरची

ये च्युतपागल जगा
तू चुत्थड बत्थड बाजाराचा स्वयंभू
रे रिंगणाच्या गुलामगिरा
हे योनी राख्या
इथे राखेराखेतूनही उठतात अतृप्त खुणा
शारीरिक / मानसिक
तू एक धिंगाण्याचे वर्तुळ
तू अनेक वावटळीना जोपासणारी महावावटळ
तू नंगानाचाचे उधाणपर्व
जन्मपूर्व ते मरणोत्तर

मी ताट पंगती बाहेरचं
म्हणून उष्टं खरकाटं
माझ्या बेचैनीचे उट्टे कशावर काढू
मी शोधतोय अनेक माध्यमांचे न्यूनगंड
कशाने होणाराहेत समूळ मूळाक्षरे शांत
नातीगोती सख्खे परके
यांच्या उरातले पुसू पहातोय मी संस्कार
क्षुधा / मैथुन / आहार / निद्रा
मुद्रेवर उमटवतोय यांच्याशी अपरिचितता
अन् करतोय कानाडोळा परिस्थितीनुसार

मी एक जब्बर तन्दुरूस्त तंद्री
डावलतो बहुसंख्य त्यांच्या चक्राचे तेच तेच
तुम्ही सर्व चौकटचे पत्ते
मी चौकटीत न मावणारा अवकाशभेदी वैचारिक
अतृप्तानो / चौकटवाल्यानो
ओळखीचा तुकडा सोडून मी निघालोय
अनोळखी अज्ञात तुकड्याकडे तीव्र मौन व्रत लादून
मी निस्वार्थ प्रेमी
मी निस्वार्थ हेटाळ
मी अत्यंत टोकाचा ध्येय वेडा
जरी हसण्यावारी नेण्यासाठी माझ्यासारख्याची जिंदगी
तरी मी / माझ्यासारखे
प्रेतवत ध्येयाचे मढे पांघरून
मरतात आपल्याच घमेंडीत
कलंदर धुनीत

# हे निसर्गकन्ये

हे निसर्गकन्ये
मलाही सोलून कर ना
अनावृत अवस्था
आकाश न्याहळण करणारा शिंपल्याचा
मोती
नि
सप्तपाताळाचे गर्भाशय ढवळणाऱ्या
रवीचा डोळा
ह्या अनादी अनंताच्या गूढ सांगाड्याची कर सांगड



मोतीचूर लाडू चुरत चुरत
धमन्या धमन्यांमधे पेरू दे किरण कळ्यांचे कारंजे फोफाव
ह्या शष्पाच्या कोसलात
येऊ दे नंग धडंग मरण आत्म्याला
घे अवघे
चैतन्य
दे शुभदे
अंतरात्मिक आनंद



निर्वासित सत्याची लावून टाक वासलात
हस्तलिखिताची तयार कर मुद्रणप्रत
कल्याणमल्लाचे अनंगरंगरतीशास्त्र होऊ दे क्रियाशिल / आसनाधिन
तप्ततरलगंधदर्वळ संमोहन

ह्या मिठागरातल्या गरास
चंद्रबिंबाच्या
जोजवून करू नकोस निद्रीस्त
पोकळीत
नि
मौन काळजाच्या आत्मकेंद्री जागरणावर
मांडू नकोस चित्रमय लैंगिकीकरण
साभार नकारलाही
असते आदिम वीर्यगंगाजळाची ओढ
हे ठाऊक असूनही मनाविरूद्ध
हे मुक्तसखी
हे अनावृत निसर्गकन्ये
नर नि मादी
बुडबुडा नि कळी
एका श्वासाच्या झुल्यातच मजार ज्याची त्याची
एका श्वासाचेच असते आपले आयुष्य
ह्या श्वासातल्या
रानभैर शिळीस
पळू दे
तुझ्या स्तनाग्रांच्या झाडातून घुमटाकार
नि
होऊ दे दिवंगत

# आज मुंगळे

आज मुंगळे
कवळी डाव्या हातात धरून उजव्यानं साफ करतात
आज मुंगळे
कुबड्या शिवाय एक पाऊलही सरकू शकत नाहीत
आज मुंगळे
भिंगातूनच करतात होयबा परीक्षणं / निरीक्षणं
आज मुंगळ्यांचे
कान बहाल आहेत सभा / व्यासपीठाच्या गर्दीसाठी
आज मुंगळ्यांचे

अंगठे घेतले जाताहेत गुरूदक्षिणेत
आज मुंगळ्याच्या
जिभांचा घेतला जातोय रोज रिमांड
आज मुंगळ्यांच्या
बुद्धीला / मेंदूला पद्मश्री वाळवीची
आज मुंगळ्यांच्या
जागरूकतेला दर सकाळी क्लोरोफार्मचा उकडा
आज मुंगळ्यांच्या
संरक्षणाची मागणी फेटाळतात ती नस्ते लाच म्हणून
आज मुंगळे
झालेत सिमेंटी शेताच्या अमूकतमूक माळ्यावरचे रतीब
आज मुंगळे
निमूटपणे बघतात नि ढेंगा उघड्या टाकून नाचणारा भ्रष्टाचार
आज मुंगळे
दवडतायत वेळ पाहण्यात मदारीगारूडखेळ टी.व्ही.: स्वस्त मनोरंजन
आज मुंगळे
खाली मान घालून जातायत तसेच येतायत
ते चकरा घेतायत घेतायत गिरक्या स्वत:भोवती
फक्त स्वत:भोवती भोवती स्वत: फक्त
जो तो आकुंचन पाऊ लागलाय
स्वत:च्याही स्वत:त विसरून आपल्यातले ते ते
पिंजणे नसानसाचे
ठणकणे मांसामांसाचे
हा तो मी तू ती ते तुम्ही आम्ही सर्व मुंगळे
होऊ लागलो आहोत काळे कुळकुळीत ताशीव दगड
तुरुंगाच्या भिंतीसाठी
त्यासोबत कैदीही

# वेवहारीक देवयानी केस

हे भावनिक भाकित
कदाचित
तुझ्या अस्थिर अधू वेवहारीक
दृष्टी व खेळीला
न सोसणारं न पचनी पडणारं....... तरी .......

माझ्या जवळच्या मैत्रिणे
वेवहारातल्या भव्यतेला नस्ते शाश्वतता
दहा हजार आंतर्विरोधाच्या उदात्त गदारोळात ती
कुठल्या कुठे लोपून जागारी
पोटाला अन्न लागतं हे खरं असलं
तरी भुकेची भावना ही केव्हाही त्याहून मोठीच
मैत्रिणे
हुरूपाच्या तरंगाआड दडलेला
कुरूपाचा हिडीस अनंगरंग दिसत नसतो गं
दिशाभूल करणाऱ्या ह्या कैफात
तुझ्यासारख्या अधोर्थळ कोनाला तर नाहीच नाही
शक्याय
कदाचित कोणता तरी इशारा थोपटत असावा
पाठ तुझी परिणाम बाहेर येण्याआधीच
मैत्रिणे

८१ १

हा पाठलाग सोड चकव्याचा
ही दलदलीची वाट बदल
हा शोध कर बंद मृगजळातल्या जळाचा
ही नखं परज नि लाव संधी साधूपणाच्या नरडीला
हे वशीकरण थांबव वेवाहारीक अभिसरणाधारित
दुनियेला रचू देत ग
वाटेल तेवढं कुफरांड
तू मांडू नकोस तरी कैफियत कुत्तेमल्हारी आवाजात
तू पडू देऊ नकोस फरक बोलल्या शब्दांत नि कृतीत
तू खेळूही नकोस स्वत:शीच आपालिपा
मैत्रिणे
हे अध्रूव गरगरणे स्तब्धतेत बदल
हे बेत हे आडाखे ह्या योजना उधळ
लाद स्वत:वरच मौनव्रतचा कर्फ्यू
कर पाणलोट एकदा या कोंडलेल्या न्यूटरल आसवांचा
हो मोकळी
हो मोकळी नव्या दृष्टीनं पाहण्यासाठी
घुमू दे  नव्याने स्पंदनांचा संबळ
फुटू दे नव्याने घुमारे रक्ताखालून

मैत्रिणे
ह्या अशा शेंसरगाठीच्या मागे धावण्याने
गाठी पक्क्या होत नसतात ग होत नसतात
मैत्रिणे
एवढंच लक्षात ठेव
तुला कुणी शेपूटकल्याणी म्हणू नये उद्या
बस्स

# ह्या डोळ्यामागच्या इंद्रधनुष्याचं काय

हात बेकार
पाय परतंत्रा / अस्थिर
अमूक तमूक देह न् त्याचे बारसे बद्नाम
निंदानालस्तीचा विषय
मद्रास सुपारीसारखा हिरड्यानंही चाबळता / फोडता यावा असा
इतकं स्वस्त मोजमाप
अनेक पिढ्यांपासून एखाद्या परंपरेसारखं
प्रसरतोय हा अनाकार अमीबा
अधिकाधिक ताणत तडकवत पाठपोट तडे
ही सोज्वळ साडेसाती
ही सालस लस संसर्गजन्य
ही प्रलयकारी फुंफाटाची वाट
ह्या वाटेवर
वाट्याला येणाऱ्या अनेक हुबलाक गुदमऱ्यांचे
सांत्वन / गळचेपी करत
जोपासलेले झोल झाल / लोचे गिरी
क्षणिक / प्रासंगिक
ठाम मतांचे विभाजन
पॉजिटिव्ह / निगेटिव्ह
या पेक्षाही वेगळंच सलतं / डसतं रोज
अनाकलनीय चिंतेचंच चिंतन
अनेक तुकड्यांत छिन्नभिन्न होऊन वावरतो आपण
अस्थिर / अधीर

आपणच घडवलेले माठ

माथी मारलेलेही अनेकांच्या
फोडता येत नाही आपल्यालाच
अनेकांचे प्रेरणा ठरणारे आपले बोल अन् आपण
कोणत्या प्रेरणेची / ऊर्जेची वाट बघतो आहोत
या आदर्श खंतेच्या गर्तेतली कुतरओढ
करून एक गुंजभर गोळी देहाची
बसवते आपल्याच डोळाखोबणीत
सैरभैर
स्वतःची चाल / निर्णय
सुकू घातलेला वाळा पालापाचुंदा होतो आपण

तगण्यासाठी कुडी
हवीच हवी मुडी
प्राथमिक गरजेवरच अडखळणारा ठेचकाळणारा
जखमी / रक्ताळ ध्येयाचा अंगठा भाग पाडतोय जगण्यास
झेलत दडपणांची आवरणेच आवरणे
त्यात
लताचे गाणे
साहीरची शायरी
मदनमोहनचे संगीत
गुलाम अलीची गजल
हा एक समाधानाचा सुस्कारा
हे एक लोभस विषयांतर
पोट विसरायला लावणारे तात्पुरते
त्या बाहेर
ठिणग्यांच्या सरी
काट्यांचे वर्षाव

अश्रूंचे ओथंब
वादळी घोंगाव
हुंदक्यांची धारावी

एका निर्णयाची चुकलेली वाट
एवढं परास्त / उध्वस्त करते कर आयुष्य
पिऊन पिऊन भांगरस
कुठवर जिरवावा रसभंग गडद

सूर्य फुलतो नितनेमाने
तसाच बदल न घडलेले आपण
चिंताक्रांत सूरस्वरांची हट्टी घुस्मट तरी म्हणते
होईल ते होईल
ही एक हवा निष्फळ पोकळ उर फुगवून चालण्यासाठी
विधवा खिशात भरलेली टंच
सवाष्ण होतात कधीमधी लिव्हव्हेकेन्सी सारखे
घटस्फोटाची निश्चित तारीख रोज गिरवत

हे पळणे रानोमाळ
हे भूमीगतणे सातोपाताळ
हे पटवणे मोजक्याच लोकांना
हे लिपणे बुरख्यातून भोकांना
ह्या ऊनसावलीच्या खेळातच फिल्टर जवळ
करू लागलेय सिग्रेट
तर मग घड्यामागच्या ऊनपावसाच्या खेळाचं काय
ह्या डोळ्यामागच्या
इंद्रधनुष्याचं काय

# खुल जा सीमसीम

खुल जा सीमसीम म्हणत
ओठानं तिळाला  ढिम्म
घुसलोय तुझ्या समुद्रात
तू एक नमुनेदार नग हिमनग



*दिसतेस त्याच्यापेक्षा प्रचंड लपलेली*
*त्या न दिसणाऱ्या*
*पण मला दिसलेल्या / जाणवलेल्या भागांवर*
*घेतोय टकरा*



हिरावण्यासाठी कणाकणातलं हिरकणीसत्व
धडपडतोय फेण्यासाठी वस्त्र नि
पहातोय वाट त्यासाठीच्या पराकाष्ठी निर्णायक समयाची
ह्या अखंड परिश्रमात भेटल्या रांगा

दाण्यासाठीच्या
पाण्यासाठीच्या
साखर गुळासाठीच्या
मातीतेला साठीच्या
आक्रमण / अतिक्रमण शिकवणाऱ्या नको त्यापेक्षा
खंग लाचार करणाऱ्या

तांबड्या रक्ताला आणिक गडद लाल
करणाऱ्या
मार्क्स फिडेल माओ आंबेडकर कबीर गौतमचे
मुशाफिरीवर असलेले दर्शनजाळ
जाळू लागले मला माझ्यासह सभोतालचं ताल बेताल
अंतर्बाह्य
ह्या ऐतिहासिक मैलाच्या शिल्पांशी मैल धुणाऱ्या
माणसांशी
गारूड गोंधळाचं चाखण मिटकणारे
हे रंडीबाज विदूषिके
करून दिलीस तू प्रस्तावना
पेशी पेशी लढवय्यी करणाऱ्या हे भ्रष्टाचाराची पुतळी
तुझे आभार
तुझं पितळ उघडंउपडं पाडल्याशिवाय का
आता थांबणाराय हे धगधगणारं धनइंधन
कुठवर ही हाडाहाडाची चिडीचूपता
टाकत राहील इच्छेइच्छेचा वासा वणव्यात आपल्या तुपल्या

हे भ्रष्ट पुतळे
हे महामाये
हे सटवे
हे टवळे
तू १६ शिनगार ५२ नवऱ्याचा संदिग्ध बर्म्युडा ट्रँगल
किती यंत्र तंत्र मंत्र
किती जीव जीवाणू मुंग्यामाण्सं गिळून मूग गिळून
बसणारं
ह्या ट्रँगलपलिकडच्या कृष्णविवरात दडलेला
तारा
मोती
तुषार छिनून घ्यायचाय मला
प्रिआपसचं कायमुद्दिपित लिंग होतोय मी
अथक संभोगाचं वरदान घेऊन उतरलोय फडात
अनेकांवर षंढत्वाच्या सुवर्णमुद्रा उधळून
हे दुटप्पे
तू राखलंयस तुझं वांझ / गर्भारपण

हे कुमारिकेचे कुमारिके
हे रखेलीच्या रखेली
हे मातोश्रीच्या मातोश्री
तू कोणत्या रूपात फेडून देऊ इच्छितेस सत्वांदण
ह्या तुझ्या नवीन
प्रियकराचं
बावाचं
मुलाचं

# मीनल सुगंधी : कवितेसाठीचे कोलाज

संथ डोहाच्या कातीवर
पातळ पाकळीच्या नितळ स्पर्शानं
उठावा गुदगुली थरार अन्
तो हिंदकळ सरकावा अल्ल-अल्लदपणे किनाऱ्याकडे
तसे अगदी तस्से
तुझे हास्य जातं भरून अंतर

तुझ्यामाझ्यातले

बऱ्याच दिवसापासून दिवस हे असे
बरेच गुपचूप अंत:करण चिडीचूप तडणारं आतल्याआत
आपण दाखवत नसू तसे
आपण खेळवत असू असे

हा एक रोजचाच खेळ
होत चाललाय फैलाव धमन्याधमन्यातून
ह्या डेंगूतापाचा
त्याला कोणते घालू विरजण
तुझा रोख रोख
नेतो लुटून सर्व उधारीवर न ठेवता
साधा एक ठोकाही
कानाच्या पाळीवर
केव्हाची कुठवर घालणार आहेस अशी
दुधी रांगोळी जीव भुलवणारी
अजून किती दिवस भोगू शिक्षा
तुझ्या नजरेच्या मौन प्रार्थनेच्या स्पर्शाची
दाट दाट घनदाट
होत चाललंय अबोल संभाषण
तंतोतंत गुंतागुंत वाढती
चैतन्यतळाचा ठाव घेण्यासाठीची तुझीही माझीही
सुरांची सुरी फिरत राहते रूपानं तुझ्या
देह चिरीत
हृदय घेतं स्वत:तच् गोलांट्या पीळ वाढवणाऱ्या
मुके मनसुबे ठणकतात बाभूळगाठींसारखे

हे सुवर्णमूर्ते
झुळकेनं हेलावणाऱ्या
पिसापेक्षाही नाजूक शहारा सरसरतो तसूतसू
तुझ्या कौमार्य नावाच्या स्मरणानं
तू एक शुभ मुहूर्त
तू उभी सोनधूळ
तू एक ओवी कंठाशी अडकलेली
तू रोजची अर्धशिशी
तू होशील का गोंदण माझ्या आयुष्यावरचे
आयुष्यभरासाठी

मी समजू शकतो
माझ्या सोनमासोळे
कंसातलं उच्चारलं जात नाही
मनातच वाचलं-बोललं जातं
तूमी कंसातले शब्द
तूमीच वाचक
ही कशी भूमिका
संमिश्र व्याधीच्या व्याधीने जर्जर आपण दोघेही
हे असे कुठवर
सांग ना ए शुभमुहूर्ता
हे असे कुठवर

कित्ती कित्ती हॉर्सपॉवर लावू
हे कंस उखडण्या
शब्दाशब्दाच्या मुक्ततेसाठी
शब्दाशब्दाच्या मुक्ततेसाठी

# उपरोधिक : या शतकाला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2443
१७७८८
ग्रं. शाखा (स्थळ ग्रंथ)

*या शतकाला*
*ज्ञानविज्ञानाच्या आदिम प्रतिभेचे*
*वरदानाय*
*मुखपृष्ठासारखे उलटवले जातात देश*
*सुवर्णाक्षराच्या इतिहासाबरोबर*
*सकृत / विकृत वापर ज्याचा त्याचा*

या शतकाला
लाघव लावण्य न् सौंदर्याय
काढण्यासाठी दृष्ट
उपसल्या जातात काजळखाणी
करत कोळसा करोडो करोडो जीवांचा
काळाकुट्ट

या शतकाला
अनिश्चित निश्चितताय खरपूस
दिवसाला ५ घटस्फोट ६ लग्ने
लागतात एका मादीची
घटकंचुकीतनं सुरूय अदलाबदल
स्त्रीमुक्तीची

या शतकाला
निरर्थक वादाचा अर्थपूर्ण अर्थाय
प्रत्येक जण सिसीफस
यंत्र मानवीयुगात आपले हात फक्त बटणं
धड वायरिंग पेटी
हालचालीसाठी

या शतकाला
अल्बमी काळी कोरी
करकरीत करवती जीभाय
प्रत्येक घास अणूचा गिळत सुटलाय
शहराची नरडी
खडी खडी

या शतकाला
स्वैराचाराचे वैचारिक पीकाय
जेथे एकपतीत्व / एकपत्नित्वाला
दिलाय शह शहनशाही थाटात
वावरतेय खाज / पोरनो / अैय्याशी /
लैंगिक विकृती

या शतकाला
शोकंतिकेचा अशोकपूर्ण अंताय
चालूय त्यासाठी सापमुंगसाचा गारूड गदारोळ खेळ
डमरू / पिपाणी लंडन / निपाणी
पापणीच्या उघडझापीत
रक्तप्रपाताचा धबधबा

या शतकाला
सकस संकरीत कलमी पीकाय
मानवयोनी प्रसवते सहा सहा
गाईला माणसं कुत्र्याला डुकरं
वाघिणीला होतात बोकड
हे प्रगतीचे टप्पेटोणपे

या शतकाला
अनेकानेक शतकांचे भवितव्याय
जीवजीव निर्जीव जलचर भूचर
वनवृक्षभेळमिसळ पेट धगधगीत
आकाशमांडवाखाली
प्रलंयकारी मौन रोषणाई

नातलगांनो / जात लगांनो
बेटी झाली बेटी
पहिली बेटी / धनाची पेटी
धनाची पेटी / पहिली बेटी

गाववाल्यांनो / शिववाल्यांनो
बारशाला यायचं बरं का

या या
बसा बसा आनंद झाला
काय म्हन्ला
पाळणा

आवं ह्यो काय पटकुऱ्याचा झोळणा
बायांनो सुरू करा (रड) गाणं
फुकलं का कान
घातल्या का घुगऱ्या
मारलं का धपाटं
धपधप धपधप धपधप
पायल्या मासी
जू बाळा जू जू रे जू

लक्षुमी लक्षुमी
ग्वाड नाव हाय मामी
लइ ग्वाड
हुंड्यावानी ग्वाड
बगाबगा चांदबी हसतूय छपरातनं
त्येच एक बरं हाय राकेलापायी अडत न्हाय
आपल्या चिमनी कंदीलावानी
घेतलं का च्या पानी
बरं बरं या या व्हय व्हय नमस्कार नमस्कार
आमी लक्षुमीचं आईबा— आमी लक्षुमीचं आईबा

न्हाय न्हाय आवं
आवं बेटीबीटी न्हाय दलींदरीत लक्षुमीची भरच फुरं
आनी कुटं
तर काय जावाळ कापी हाय
हूं यायचं व्हय लक्षुमीची वाट बगतू

या या न्हावीमामा
कवाची वाट बगतूया
कापून टाका आमच्या दलींदरीचा योक योक केस
आँ मुळासकट न्हाय जमनार म्हन्ता
ह्ये आमच्या पाचवीला पूजल्यालंच
साडीसातीन् काय

आवं शेजाऱ्यांनो पाजाऱ्यांनो
आरं पोराटोरांनो
चिडवू नगा रडवू नगा लक्षुमीला
न्हेमी घरातच का आस्ती
आवं पोलीव झालाय डाव्याला
डाव्याची नीट वाढ झाली न्हाय
आता दलिंद्री रखडत खुरडत फिरतीया घरभर
बरं झालं लक्षुमीला पळून जाता न्हाइ येनार

आवं आवं न्हावीमामा
अवं दमादमा
माजं काय इचारता म्या लक्षुमीचा बा
जातीया जातीया नवव्या बुकात
दलिंद्री सावलीवानी असती बगा जोडीला
बरं एक काम करा
शेहरातली फेसन करा
म्हंजी रिबीन त्याल येनीफनीचा तरास न्हाइ
आता सुंदिक जमनार न्हाय का मुळासकट
बगा बगा अवं लडवा डोकं
न्हाइच वट्ट

ठिक हाय
पैसं
पैसं देतो गावच्या बाजाराला
अजून जत्रा पुरवायची हाय कळलं का
दलिंद्रीला दिलं न्हाय ब्वाट
तरीबी लंगडत पिच्छा सोडिना स्वाट

आरं हसतुस कशापायी
आता झाली की उम्मर
बग ह्या सुरकूत्या बग हये लटपटतं हात
हूं हूं त्ये बी पडलं योकबी ऱ्हाइला न्हाइ दात
चालल्या चालढकल
काय म्हन्ता राव
ह्ये काय बोलनं
आवं म्या जगलो तर आमची लक्षुमी कशी मरंल
हायजीत्ती ह्याय दलिंद्री जीत्ती हाय
किती वर्साची झाली
आवं ह्या १५ आगस्टाला

अवो रडू नगं तर काय करू
कितीबी वर्साची व्हून फायदा न्हाय
एवडी दांडगी व्हूनबी एकदाबी बसली न्हाय कोपऱ्यात
एकदाबी घातला न्हाय तांब्या पालथा दलिंद्रीनं
महिन्यातल्या पाच दिसाच्या शिरमंतीसाठी

एकदाबी घातला न्हाय तांब्या पालथा
महिन्यातल्या पाच दिसाच्या शिरमंतीसाठी

या या न्हावीमामा
कवाची वाट बगतूया
कापून टाका आमच्या दलींदरीचा योक योक केस
आँ मुळासकट न्हाय ज़मनार म्हन्ता
ह्ये आमच्या पाचवीला पूजल्यालंच
साडीसातीन् काय

आवं शेजाऱ्यांनो पाजाऱ्यांनो
आरं पोराटोरांनो
चिडवू नगा रडवू नगा लक्षुमीला
न्हेमी घरातच का आस्ती
आवं पोलीव झालाय डाव्याला
डाव्याची नीट वाढ झाली न्हाय
आता दलिंद्री रखडत खुरडत फिरतीया घरभर
बरं झालं लक्षुमीला पळून जाता न्हाइ येनार

आवं आवं न्हावीमामा
अवं दमादमा
माजं काय इचारता म्या लक्षुमीचा बा
जातीया जातीया नवव्या बुकात
दलिंद्री सावलीवानी असती बगा जोडीला
बरं एक काम करा
शेहरातली फेसन करा
म्हंजी रिबीन त्याल येनीफनीचा तरास न्हाइ
आता सुंदिक जमनार न्हाय का मुळासकट
बगा बगा अवं लडवा डोकं
न्हाइच वट्ट

ठिक हाय
पैसं
पैसं देतो गावच्या बाजाराला
अजून जत्रा पुरवायची हाय कळलं का
दलिंद्रीला दिलं न्हाय ब्वाट
तरीबी लंगडत पिच्छा सोडिना स्वाट

आरं हसतुस कशापायी
आता झाली की उम्मर
बग ह्या सुरकूत्या बग हये लटपटतं हात
हूं हूं त्ये बी पडलं योकबी न्हाइला न्हाइ दात
चालल्या चालढकल
काय म्हन्ता राव
ह्ये काय बोलनं
आवं म्या जगलो तर आमची लक्षुमी कशी मरंल
हायजीत्ती हाय दलिंद्री जीत्ती हाय
किती वर्साची झाली
आवं ह्या १५ आगस्टाला

अवो रडू नगं तर काय करू
कितीबी वर्साची व्हून फायदा न्हाय
एवडी दांडगी व्हूनबी एकदाबी बसली न्हाय कोपऱ्यात
एकदाबी घातला न्हाय तांब्या पालथा दलिंद्रीनं
महिन्यातल्या पाच दिसाच्या शिरमंतीसाठी

एकदाबी घातला न्हाय तांब्या पालथा
महिन्यातल्या पाच दिसाच्या शिरमंतीसाठी

# ह्या मरण पंथावर अगतिक

ह्या मरण पंथावर अगतिक
कवनाला कवटाळताना
शेवटचे किती दिस
चुकवत फिरलो असतो
आपल्यातल्याच चिरंजीव ठिणगीपासून
आपल्यातलं हिर्वशार अरण्य
जीव जडून जातो
जीव झडून जातो
ह्या हिलगडीत जीवाचं बन्धन
जीवालाच उरत नाही
तयार असतो तो भावनावश
पोटॅशियम सायनाइड चाखण्या
वीर्यतीर्थात मिसळून



किती किती कवितीक अस्तं हे मरणभाग्य
ते ह्या दृश्यमान वेवहारी रांगड्या त्रांगड्याला
कळायचं नाही
रे उसवलेल्या तळटिपेच्या पवित्र देवळीत
ठणकणाऱ्या वेदनेला दिक्‌कालाचे कुठे अस्ते भान
हे जगड्व्याळ हिशोब्या
झोळीझोळीत करानं ठोकरा ओतताना



बाशिंगाच्या शिंगानं उकरलेली माती
निराळंनी समुद्रमेखलाच्या पेशीपेशीवर रेखांकित मधुर विसंब
शिवधातू चंद्रसानं जख्ख जख्खंचे डांकलगकरण
अमृतमंथनानंतरच्या निद्रेचा डुलका
वडग होणं उभयपक्षी क्षणभर
करबदल्या डोळ्यातल्या पेंगूळ प्रतिमा खुडणारी सूर्य किरणं
ध्येय ध्यासचा निर्मिती आनंद
हे क्रियाशील भावना शीलत्व
हा शब्दचित्र शिल्प लेख
टिपण्यास मूकलायस तू
हा सहकार स्वाध्याय असतो जपायचा
एका ठिणगीनं
एका अरण्यानं
स्वतःतल्याच ठिणगी नि अरण्याची गाठ पडेपर्यंत
घोड्यांना बसायचं नस्तं
मैदानानं दान करायचं विसरायचं नस्तं
एवढेच
एवढेच घेऊन चाललोय मुठीत
ह्या मरणपंथावर
नि
नंतरही

# नामदेव लक्ष्मण ढसाळ

हे एन् एल् डी
तू भूलभुलैयाचा संस्थापक
ज्यात हरवलीय दैनंदिन वाट तुझ्यासकट
तुझा बुक्का लावणाऱ्यांच्या
तुझा ताईत बांधणाऱ्यांच्या जिंदगीची
झिल्हई कल्हई बाहुले भोरीप
उभा करतोस तू त्यांच्या उद्याचा
तुझा आज गुजरण्यासाठी

अभिचादिक भाषण भेंडोळ्याच्या भांडवलाने
कुठवर गोळा करशील बिनपावतीची चोरचुंबा
कुठवर दाखवशील तूच एकदिल नसलेल्या मोर्चाची दहशत
कुठवर मिरवशील तुझ्यात नसलेला ढाण्या डरकाळीचा ढोंगधत्तुरा
तू एक कुंटण संत फॉकलंड रोडचा
तू एक पोटभरू जादूगार फुटपाथ छाप / हातचलाख
नाहीतर भर व्यास पीठावरची तुझी दादागिरी
कशाला धरील दादांचे पाय बिलासभर खळग्यासाठी
तू नाडतोस / नागडवतोस तिसरा दर्जा / चौथा दर्जा
तू मारतोस डिंगा
तू पिकवतोस खिसाणीखसखस एखाद्याला थूक लावून
दिवसेदिवस साठत चाललेल्या तुंबल चंद्रबळावर

फुटपाथच्या चिंधडीचा स्वाभिमान
बांबूपासून अलग झालेल्या चोयीचं स्वातंत्र्य नि आस्तित्व
नस्तं तुझ्या छाती फुगवून चालणाऱ्या डोळ्यात

तुझ्यापेक्षा एखाद्या जन्मसवाशिणीचा जन्म पुण्यवान
हे तरंगत्या रिकाम्या जीभूता
येड्या बागड्या बंजर जमिनीच्या आत्म्याच्या भेगा
आशेनं पाहताहेत रे
तुझ्यात नसलेल्या थेंबाची बरसण्याची वाट
हिरव्याकंच काचोळीसाठी
[ कशी भरून निघेल फाकत चाललेली दरी ]
हे एन् एल् डी
सुधर आता तरी सुधर
आम्ही बिघडलो
तुम्हीही बिघडाना चं पालूपद कुणाकुणाला ऐकवशील
दंगलीतनं शहाणपण शिकून
तिला वन्समोर म्हणणारा
तुझ्यातला कवी सोसतो तरी कसे हे बलात्कार
[ का रचना कौशल्यापुरतंच आहे हे सारं ]
एखाद्या दृष्ट्यासारखं बोलताना
किती वेळा घालतोस घाव बोधिवृक्षावर
काँग्रेसीसुख उपभोगण्याच्या कैफात

शेवटी तेच खरं
अंगभूत / जन्मजात जे जे
त्याचं दमन होत नस्तं मुखवट्यांच्या लेपानं सारवून
रे मवाल्या
सारवणाच्याही पडतात खपल्या ढपल्या
देवीचे व्रण होतात घरभर
मायस्थेनिया झालेल्या देहाचे हात पहात राहतात जिवंत कबर
अन्

# मी शापभ्रष्ट

मी शापभ्रष्ट
चंद्रदेवतेच्या झुलूदंतकथेचा नायक
मी गाण्यानंतरच्या
आगीत घरटं जळून मरणारा ककनू
मी दिवाणा कलंदर
इप्सितवेडा मनमोरनृत्य धिंगाणातालबद्ध
हे पक्षिणे
माझ्या नायकीणेला शापमुक्त होता येणार नाही
माझ्या गाण्यावर बंदी घालता येणार नाही
माझ्या पेटणाऱ्या घरट्यातून उडून जाता येणार नाही
माझ्या इप्सिताची सावली व्हायचं नाकारता येणार नाही
याउप्पर
हे मनात झंकारणारे कचाटे
ही अविरत घुमणारी बंदीश
ही स्वतःच स्वतः कुस्करून टाकणारी घालमेल
हे झिजू घातलेले उतू पळासाठी पळपळ
हे बारा पिंपळावरच्या मुंज्यासारखे जिणे
हा जीवापल्याडच्या प्रयत्नांना अटळ निगेटिव्हनेसचा चिरायुगोंद
हा सर्वसंगपरित्याग
शुक्रातल्या चंद्रसूर्याला लांबणीवर ढकलून
उदराला झोडपून
गर्भाशयाला गहाण ठेवून
खतपाणी घालून जोपासावा लागेल

माझ्या पक्षिणे ठरव
ठरव नायकीण व्हायचं की नाही ते

# तुझा कोट टाय घालण्याने

तुझा कोट टाय घालण्याने
संविधान शिल्पकार होता येणार नाही
वा
तुझा चश्मा पुसल्याचं नातं सांगून
बघता येणार नाही तुझ्याएवढं
सूक्ष्म / आरपार
व्यापक / सर्वंकश
तू दिलेली हाक
आम्ही दिलेली हो



यामधे आज भिंती बांधल्या जातायत
खोडरबर होऊन
पुसू पाहताहेत तुझे शब्द हे पांढऱ्या चोचीचे चवचाल कावळे
काळजा काळजावरचं शिल्पकाम
इतक्या आसानीनं झिजवता येईल काय

तू झालास नि आहेस
तरी त्यांचा आमचा सर्वांसर्वांचा



तुझ्या वीर्याची परंपरा सांगणारं रक्त सुध्दा
भिंती बांधणाऱ्याशी करू लागलंय् हातमिळवणी
माया अंगासारखी गुप्त खलबतं
त्यासाठी बांधली गेलीयत न्हाणी घरं
न्हाणी घरात पोतेऱ्यासारखं पिळलं बडवलं जातंय तुझं रक्त
रक्तारक्ताला रक्तगटाला लाजवणारी खिंडारं
खिंडार खिंडार शाकारू लागलंय सवतासुभा
सुभ्या सुभ्याची तट नि बुरूज बांधणी
ज्याची त्याची निशाण रोवणी तुझ्या नांवाखाली
त्वा घेतलेल्या परिश्रमाचा
मोबदला उकळण्याचा हक्क
तू मृत्युपत्रात नमूद करून गेला आहेस काय

तसं नसेल तर
का अजून संपला नाही माहेर छळ
कुठवर ह्या मूठभर सवलतींचा काळा बाजार
का हे वाहणे वेग वेगळ्या धारेतून
कुठवर ही धुळवड न् फुफाटा
नि रोज एक नवीन निळा बोभाटा
लाफ्याचा लफाटा असलेल्या रंडीबाजांची अक्कल
फासू शकते डांबर तुला
पेडर रोडच्या ब्लॉकसाठी
जयंत्यान् मयंत्या देखील
ओरपतात हे महिनोंमहिने
खाती फुगवत
नाना तऱ्हेचे व्याप उपद्व्याप अविरत
तुला शांती मिळो / तुला शांती मिळो

हे आरंभशूरा
हे साम्यक लढ्याच्या अग्रेसरा
तू सर्वात प्रथम ज्याला गाडून
ज्यास अग्रस्थान दिले
त्या माण्सानेच संस्कारित व्हावे पुन्हा
तुझी हाक विसरून
त्या गाडलेल्याला हाकारण्यासाठी
अशा गांडू बगीच्यांची लागवड नि पैदास
तुला तरी अभिप्रेत होती का

ही षंढांची झवाझवी
ही वेडझव्यांची पायपीट
ही मयखान्याची बरळ
ही रंडीखान्याची खुणवा खुणवी

कुणी घेतलय तुझं डोकं
कुणी डोक्याचे केस
कुणी केसाचं टोक
कुणी घेतलेत तुझे पाय
कुणी पायाचं नख
कुणी नखातला मळ
बटवाऱ्याचाही बटवारा
करण्याचा हक्क तू देऊन गेला आहेस काय
आपल्या मृत्युपत्रात
अजून किती करणार आहेत चिरफाड
तुझ्या शरीराची
तुझ्या तत्वज्ञानासकट

# संधिविग्रहातील सुवर्णमध्य साधण्यासाठी

झकास प्रियतेच्या
जुळणाऱ्या प्रियांकाच्या अनुषंगानं
अविर्भावाच्या पंखातनं
श्वास घेताना श्वासागणिक
फुटलेल्या आयन्यात वळून पाहिलेली प्रतिबिंब नि
अंगभर यातनांचा संदल निमूटपणे
पाळत जोपासत सात पडद्याआड
ह्या संथात तंतोतंत
नि
कुणाच्या तरी डोळ्यातली शकुनवंती
गिळकृंत करत सुटते आपले स्वप्नील खडे
रूमझुम रुंजी झुमत घुमत
घेत राहते वेध पैंजणाच्या तीरंदाजीतनं
अशा शिलकांत
कलेजा टपकतो अह्रो रात्र छिद्राछिद्रातनं मेणमेण
स्खलनशीलतेला धरून
तसे जख्खांचे ठणके / ताण
विचारात घेत नसतात शिळा / ताजा बिब्बा
हे जगजाहीर मुरळे
कोणत्या फुंकरीवर होणारेस फिदा
कोणत्या शिडीवरून घालणारेस
अदाकरी सलाम रागदारी
किती पेरापेरांच्या झुळकांचं सुरावटलंय हृदय
नि पेटल्या पेटवल्या दारूच्या कुप्प्या / नसकांड्या
कोणत्या तिमीरावर लिहू इच्छितेस
सप्तसुरांची गर्भधारणा
लिपी नसलेली

बातचीत खलबतीत
शामाटेगिरी चालुचाय निरंतर

हा तुडुंब टब बाथातला डुंब
हा धुंद उत्सव भाडोत्री
ही अडीच मिनिटाची ध्वनिमुद्रिका

अगणिक अंबाडे
सैल करूनही आपल्यासाठी
धपापणारा काळीजठोका
हाती लागलाच नाही
अंबाड्यातनंच काळजाला हात घालतात
तरी
साला
बाव्हल्याचं काही खरं नस्तं
बाव्हल्यांवर बाव्हल्या नाचवू नयेत
असं म्हणून ठरवूनदेखील
उतार वयांच्या
श्रांत वेचनासाठी प्रत्येकजण
डिपॉजिट करून ठेवतो चुंबनं नि मायापाश
सदरताळ्याच्या सईसुमार आधारानं
सगीन संवथळावर
पेरून हिर्वं
अगोट अकाळवणीची आळवणी करत
संधि विग्रहातील
सुवर्णमध्य साधण्यासाठी
माझीही दिलखुलास विचार पूस पूस वा पोस

# तकलादू

तकलादू
चित्तभोर माणकांनी डवरलेले द्वार
मोरपिशी बोटांनी लोटून
ये
दवाची पावलं उमटवत उदभरी गंधाची संपृक्त

नि वाजव हाती नसलेली सारंगी
नि ऐक त्यातून न उमटलेले सूर मखमली
नि शीर शेजेवर नसलेल्या प्रियकराच्या कुशीत
नि घे ढवळून अंतरंग कल्पनारम्य घोडा छाप ब्रशानं
आपणच चूल आपणच फुंकणी
नि उलथव पालथव
भाकरी न फुललेल्या विस्तवाच्या शेकावर
मूर्च्छावस्थेत
नि भासाभासाचे क्षण शिंप पालथ्या रांजणाखालून
न झिरपणाऱ्या सायीच्या मधाळ प्रवाहानं
नि अढ्यावरचे मढे पहात लाव सजव
स्वप्नील पेंटींग्ज अस्तित्वात नसलेली
नि सरकव पळभरात शतसांवत्सरीक न सरकणारे
एकाच वेळी पार पाड भूमिका द्विदल त्रिदल दल बदल
कर पूर्ण तू ते तूचा प्रवास
जमेस धरू नकोस श्लील अश्लीलाचा हंशील
नि स्वतःच्याच आस्तित्वाचे कर तुकडे भ्रामक
नि लपव अर्वाच्य अप्रामाणिक प्रामाणिकपणे

कल्पनेतच खेळ खेळ
खेळ रचून खेळणाऱ्या हे वेडसर पोरी
तरी
कामातूर तुर्रेबाज कुकूच्कू
नि घन विभोर काकुळ कोयल
बहरा मोहरावर राहतील कूकत असहाय
असमाधानी
अभिनिवेशही वाटतो सखा सख्खा
आवेशाहून भिन्न / मूलभूत / स्वयंभू

देऊ नकोस ह्या उटपटांग गुडघा बुद्धीला बुद्धरूप
वास्तव विस्तव
नि भ्रमबेगडीजाळ यात अंतर तराळ अंतराळाचे
जळाचे मुखपृष्ठ उलटता येत नाही
लज्जा इलज्जा यामधे अंतर ठेवून ड्राइव्ह करता येत नाही
लघ्वीच्या वेणीला रिबीन बांधता येत नाही
वा
तपासता येतानाही सुपीक / नापीक मुरूम
वेडसरे
निगेटिव्ह चिंतनाचंच गर्भारपण चिरंतन
नि त्याच्या माथ्यावरील युगानुयुगे वयाची
ही तारखेची टिकली
घेत आहे वेध कुतुबमिनारच्या चक्षुतल्या
सुगंध संगराच्या ज्ञानदानानं
येडे खेळा खेळानंतर
स्पंदीकाची जडशिळ पाऊले
कबूल
तयार नसतील यात्रा थांबवण्या
पण लक्षात ठेवा
चिरनिद्रेनंतरही प्रस्थापित संन्यासाला नस्ते स्थान
माझ्या कोशात तर नाहीच
कल्पनारम्य उंची
वास्तव बुटकेपणापेक्षाही अस्ते खुजी

लावत नस्त्याला अस्त्याचे अस्तर अवास्तव
करत असतो आपण व्हाया अहिंसक
स्वत:चाच वध सावध

# पायपिटीच्या कलात्मक गर्भाशया

अंगभर
विखुरलेल्या वाळवंटाच्या खूरांला
फुटलेयत हिर्वे कोम्ब नि थांबलाय विटाळ
हृदयाचा
हतबलकलश
तपासत पाण्याची पिशवी स्विकारतोय
दृष्टीक्षेपातल्या घुमटावरील
पाख्याने धाडलेले संदेश गारव्याचे विसाव्याचे
पाय पिटीच्या कलात्मक गर्भाशया
दोन जीवाचे जड पाय टाकत
बांध तोरण आंबेमोहरी शुभमंगल
उधळत सनई चौघडा
नि उचल तिरडी माझ्या वांझोट्या झंकाराची
औक्षवंत मरणावर
लाव ओठानं टिळा नि टाक
डोळ्यानेच कळ्या ओंजळहाती
हा हाडकपाळ्या
चिरंतनाच्या कपाळावर
कोरण्याची मुभा घेतोय तिच्या आपल्या नांवाला
उत्खनननानंतर
सापडणाऱ्या अभेद्य खडकाच्या जातीवर
जो राहील
प्रलयाच्या अथांग अथांग अंगावर
रंगत / तरंगत

माझ्या सखीला ज्योतीसारखीच तेवत राहू दे
माझ्या दारातील शाश्वत कबर होऊन
सांग मनमोकळेपणानं
तू नाहीस सवत वा सवतासुभा
हा तर तुला सुखावण्यासाठीच गोळा केलेला
नवपंचमयोग
ठाऊक आहे तुझ्या सोबतीत
पहिल्या बहराचा रतीब रांडेला बहाल केलेला
येणार नाही फिरून
बूमरँग सारखा
तू रक्ताळलेलं दुःख डाळिंब
उघडू नकोस आधीच्याच क्षत विक्षतासमोर
प्रतिबिंबाचा एक हुंदकाही
जाईल जड / कापत नि करील घात
माझ्या दुसऱ्या बहरांच्या श्वासाचा

हे माझ्या अंतर्निहिता
हे माझ्या हृदयातील टपोर जखमा
असं तर नाहीना
मीच मांडत सुटलोय तुला न झालेली
संवेदना सोनेरी वेदना
जीव लावूनही माया का तुटते
ह्या प्रश्नाला गाभ्यातून घोळवत
ह्या कठीण विरहाच्या रात्री
तरी तूच ये स्वप्न होऊन
तूच ये पुन्हा स्वप्न होऊन

# एक दिशाहीन पंचमहाभूत

गुलाबी शाल
पांढरी चादर
काळी वाकळ
या तिन्हीपैकी एकही वस्त्र अंगावर न लेता
अटळ
अढळ
ध्रुवताऱ्यासारखा दिमाखदार नंगाफकीर क्षण
अजून जन्माला आलाच नाही का

जो नसेल इतिहासासाठी एखादी तारीख वा घटना
वा एखाद्या चारित्र्यातल्या चरित्राची
विशेषतः / गुण दुर्गुण / विकृती दर्शन
जो नसेल एखाद्या झोपडीतल्या दारिद्र्याचा दस्ताऐवज
वा भूकेनं मेलेल्या भूकबळींची बातमी वा हुंड्यासाठीची
ससेहोलपट नि हुंडाबळी
जो नसेल हजारो निरपराध बळी घेणाऱ्या खली / झार / गोरखा /
स्तान अन् लँडची मागणी
वा अखंड धरत्रीचा धडाचे तुकडे पाडणारी दंगल
जो नसेल सरहद्दीच्या जागत्या डोळ्याच्या
छातीत घुसणारी ३०३
वा स्वतःच्याच हल्ल्यातली स्वतःची तडफड
जो नसेल रक्तारक्तात भिनणारं मार्फिन
वा मनामनात ठाण मांडणारा अघोरी माफीया कळप
जो नसेल एकाच वेळी जगण्यातलं मरण वा मरण्यातलं जगणं
बघणारा क्रूर हुकूमशहा वा साम्राज्यवादी भोक्ता पेट्रोडॉलर
जो नसेल डांबरी नालस्तीतून डांबरी सडकेवर
वाहवणारा रक्ताचे पाट व त्याची नोंद

वा अणुबॉम्ब / न्यूट्रॉन बॉम्बची कळ दाबण्याची विध्वंसकारी वेळ
जो नसेल पृथ्वीचा अडीच अक्षरी कणा मोडकळीस
आणणारा कबुतरांचे खून
वा आंतरराष्ट्रीय पातळीवरची स्वार्थी मैत्री वा वैरासाठी वैर
जुनकोवळं
तो असेल
दिशा नि सीमा
बन्धने नि नियम उल्लंघन
पृथ्वी अन् आकाशावर
पाणी वायु तेज व गंधाची शिंपण करणारा
दगडाच्या फक्त भिंती न उभारता
दगडांनाही घरे देणारा



एक वैरागी
एक अवलिया
एक प्रेषीत
एक मुंगी पहाड तोलणारी
एक दिशाहीन पंचमहाभूत
अखिल मानवतेसाठी

पांढऱ्या पिसातून शांतीचं अमृत शिंपडणारी
अर्धमिटल्या डोळ्यांतली
नासाग्र एकाग्रता
तांबड्या भोर गुल्मोहराची आग
व पिठूर चांदणी बरसात अक्षय करण्यासाठी



असा क्षण निर्माण करणारी कूस
कोणत्या कुशीनं पैदा केली आहे का
नसेलच
म्हणूनच हे आक्रंदन
गर्भाशयाच्या पलिकडून गर्भाशयात उतरणारे
भावीतून भविष्यात चर्चिले जाणारे
लिंगारूपाची मोहर लावून वर्तमानात अवतरणारे
ढकलत रोजचा सूर्य भूतकाळात गडप होणारे
स्वतःच्या ऱ्हस्व दिर्घ
लघुगुरू कारकिर्दीचा
कात्रणे अन् फोटो
शके सन व तारखा
लेख आलेख तक्ते
स्तंभ न् उताऱ्यांसह मागे ठेवून
पुस्तकांचे केलेले ग्रंथ / एक षंढ इतिहास
सहज अन् दुर्बोधतेच्या नांवाखाली

गुलाबी शाल
पांढरी चादर
काळी वाकळ
या तिन्हीपैकी एकही वस्त्र अंगावर न लेता
अटळ
अढळ
ध्रुवताऱ्यासारखा दिमाखदार नंगा फकीर क्षण
केव्हा बरं जन्माला येईल
तसा क्षण निर्माण करणारी कूस
कोणत्या कुशीतून पैदाच होणार नाही का



दा. क्र. २४४३

REFBK-0025322
REFBK-0025322